cmyk

## संपादकीय

### कोणीही कोणाच्याही गळ्यात पडणार...!

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारयुद्धाची सांगता होत असताना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची घोषणा झाल्याने मतसंग्रामाचा पुढचा टप्पाही आता सुरू झाल्याचे दिसते. मागची दीड ते दोन वर्षे देश वा राज्यवासियांसाठी प्रामुख्याने 'इलेक्शन फिव्हर'चीच ठरली आहेत.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com   नवी दिशा... नवे विचार.....   email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र   वर्ष–५   अंक–२५८   गुरूवार दि.१५ जानेवारी २०२६   RNI No.: MAHMAR/2021/85884   NO.L SB/BEED/RNP-206/2024-26   पाने–६   किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### उमेदवाराच्या पतीवर तलवारीने हल्ला

नांदेड : मतदानाला काही तास शिल्लक राहिले असताना राज्यात काही ठिकाणी हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. नांदेडमध्ये प्रभाग क्रमांक एकच्या काँग्रेस उमेदवार सारिका भालेराव यांचे पती शिवाजी भालेराव यांच्यावर तलवारीने हल्ला करण्याचा प्रयत्न झाला आहे. सुदैवाने ते जखमी झाले नाहीत. काल मंगळवारी मध्यरात्री हा प्रकार घडला. दुचाकीवरून आलेल्या चार संशयित अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. चारही आरोपींनी आपला चेहरा झाकला होता. खासदार रवींद्र चव्हाण यांनी हा हल्ला राजकीय हेतूने झाला आहे, असा आरोप केला आहे.

### स्कूल बॅगमध्ये आढळले नवजात अर्भक

भंडारा : माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना भंडारा जिल्ह्याच्या लाखनी तालुक्यातील मानेगाव (सडक) येथे समोर आली आहे. एका अज्ञात निर्दयी मातेने किंवा पालकांनी आपल्या अवघ्या ८ ते १० दिवसांच्या मुलीला एका स्कूल बॅगमध्ये भरून नाल्याच्या काठावर बेवारस सोडून दिले. सुदैवाने, हे बाळ जिवंत असून सध्या सुरक्षित आहे. मानेगाव परिसरातील नाल्याजवळ स्थानिकांना एक काळ्या रंगाची स्कूल बॅग पडलेली दिसली. संशय आल्याने जवळ जाऊन पाहिले असता, त्या बॅगमध्ये एक जिवंत नवजात स्त्री जातीचे अर्भक आढळून आले.

### आता केरळ राज्याचे नाव बदलले जाणार?

कोच्ची : केरळ भाजपने डाव्या लोकशाही आघाडी (एलडीएफ) सरकारच्या राज्याचे नाव बदलून केरळम करण्याच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे. केरळ भाजपने या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्तक्षेपाची मागणी केली आहे. प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर यांनी पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांना पत्र लिहून पक्षाची भूमिका स्पष्ट केली. केरळचे नाव केरळम केल्याने धर्माच्या आधारावर राज्याचे विभाजन करण्याचा प्रयत्न करणा–या अतिरेकी शक्तींच्या प्रयत्नांना आळा बसेल. राज्य विधानसभेने अधिकृत नोंदींमध्ये राज्याचे नाव केरळ वरून केरळम करण्याचा ठराव मंजूर केला आहे.

### संपत्तीसाठी जावयाने केली सासऱ्याची हत्या

भंडारा :सासऱ्याची संपत्ती मिळावी, या लालसेपोटी जावयानेच सासऱ्याची निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना भंडाऱ्यात समोर आली आहे. मित्राच्या मदतीने जावयाने ही हत्या केल्याप्रकरणी आता कारधा पोलिसांनी आरोपी जावई आणि त्याच्या मित्राला अटक केली आहे. ही निर्घृण हत्या भंडा–याच्या कोकणागड येथे घडली. किशोर कंगाले (६०) असे मृत सास–याचे नाव आहे. तर पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीमध्ये जावई अमित लांजेवार (३६) आणि त्याचा मित्र योगेश पाठक (२६) यांचा समावेश आहे.आंतरजातीय विवाह केला आहे. या विवाहाला सुरुवातीपासूनच मृत किशोर कंगाले यांचा विरोध होता.

### पुण्यात मतदारांना वाटल्या चांदीच्या वाट्या

पुणे : अजित पवार आणि भाजप यांच्यातील तीव्र संघर्षामुळे कमालीच्या रंगतदार झालेल्या पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. मतदानापूर्वी मतदारांना पैसे वाटण्याचे प्रकार सर्रास घडतात. हे प्रकार रोखण्यासाठी निवडणूक आयोग आणि पोलिस डोळ्यात तेल घालून लक्ष देत आहेत. मात्र, एवढा चोख बंदोबस्त असतानाही पुण्यात मतदारांना चांदीच्या वाट्या वाटण्यात आल्याची घटना समोर आली आहे. ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी हा आरोप केला आहे. वसंत मोरे यांचा मुलगा रुपेश मोरे निवडणुकीच्या रिंगणात आहे.

### काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेजवळ संशयास्पद ड्रोन

श्रीनगर : जम्मू–काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यात मंगळवारी संध्याकाळी एलओसीजवळ संशयास्पद ड्रोन दिसले. भारतीय लष्कराने गोळीबार केला. लष्कराच्या सूत्रांनुसार, हे ड्रोन नियमित निगराणीदरम्यान फिरताना दिसले होते. गोळीबारानंतर ड्रोन पाकिस्तान सीमेकडे परतले. गेल्या तीन दिवसांत जम्मू परिसरात ड्रोन दिसण्याची ही दुसरी घटना आहे. अशा घटना सातत्याने घडत असल्याने एलओसी वरील निगराणी आणि दक्षता आणखी वाढवण्यात आली आहे. सुरक्षा यंत्रणांना अशी भीती आहे की, पाकिस्तानकडून ड्रोनद्वारे घुसखोरी किंवा शस्त्रे–अंमली पदार्थ टाकण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो.

# फळबाग अनुदान विचारले तर शेतकऱ्याला बुटाने मारलं

वाशिम । प्रतिनिधी

**वाशिममध्ये गोगरी परिसरात मनरेगा योजनेच्या अंतर्गत संत्रा फळबागेचे अनुदान रखडल्याबाबत विचारणा केल्याबाबत शेतकऱ्याला तालुका कृषी अधिकाऱ्याने बुटाने मारहाण केल्याचा संतापजनक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या घटनेनंतर आता राजकीय नेत्यांनी देखील संताप व्यक्त केला आहे. काँग्रेस नेते आमदार नाना पटोले यांनी या घटनेबाबत संताप व्यक्त करत त्यांच्या सोशल मिडीयावरती पोस्ट शेअर केली आहे. या अन्यायकारी अन्नदात्याविरोधी फडणवीस सरकारचा आम्ही निषेध करतो. संबंधित मुजोर अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली.**

मिळालेल्या माहितीनुसार, गोगरी येथील शेतकरी ऋषिकेश पवार यांनी आपल्या तीन एकर शेतीत दोन वर्षापूर्वी मनरेगा योजनेंतर्गत संत्रा फळबाग लावली होती. या फळबागेसाठी शासनाकडून मिळणारे अनुदान चार महिन्यांपासून ▶▶ पान २ वर



### शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक–पटोले

घटनेनंतर आता राजकीय नेत्यांनी देखील संताप व्यक्त केला आहे. काँग्रेस नेते आणि आमदार नाना पटोले यांनी या घटनेबाबत संताप व्यक्त करत त्यांच्या सोशल मिडीयावरती पोस्ट शेअर केली आहे. या अन्यायकारी अन्नदात्याविरोधी फडणवीस सरकारचा आम्ही निषेध करतो. या शेतकऱ्याला न्याय मिळाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही.. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार शेतकरीविरोधी आहे. मुजोर सरकारी अधिकारी शेतकऱ्यांच्या अंगावर धावून जात बुटाने मारहाण करतात. कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला आहे.

# पवारांचा भ्रष्टाचार फडणवीस-मोदींनी झाकला

## सिंचन घोटाळ्यापेक्षाही दहापट मोठा घोटाळा महामार्गांच्या कामात

पुणे । प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी युती सरकारच्या काळातील सिंचन घोटाळ्याच्या फाईलचा उल्लेख केल्यानंतर, जलसंपदा विभागाचे तत्कालीन मुख्य अभियंता विजय पांढरे यांनी त्यांच्यासह संपूर्ण राजकीय व्यवस्थेवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. सिंचन घोटाळ्यापेक्षाही दहापट मोठा घोटाळा महामार्गांच्या कामांमध्ये झाल्याचा गंभीर आरोप केला.अधिकारी, पुढारी आणि कॉन्ट्रॅक्टर या तिघांच्या संगणमताने महाराष्ट्राला प्रचंड लुटलं जात असल्याचा आरोप केला आहे.**







विजय पांढरे म्हणाले की, अजित पवार स्वतःच्या तोंडाने त्यांच्या खात्यातल्या भ्रष्टाचाराची कबुली देत आहेत, ही एक चांगलीच गोष्ट आहे. पुरंदर उपसा सिंचन योजनेबाबत अजित पवार ११० कोटींचा आकडा सांगत असले, तरी प्रत्यक्षात हा प्रकार कृष्णा खोऱ्यातील अनेक योजनांमध्ये घडला असून हा आकडा हजारो कोटींचा असल्याचे ते म्हणाले. जो पाया भाजपने (युती सरकारने) कृष्णा खोऱ्यात रचला, त्या पायावर भ्रष्टाचाराची प्रचंड इमारत पुढे अजित पवारांनीच बांधली आहे, असा थेट आरोप पांढरे यांनी केला. कृष्णा खोऱ्यानंतर तापी, नागपूर, मराठवाडा आणि कोकण महामंडळांमधील भ्रष्टाचाराला प्रचंड रूप देण्याचे काम अजित पवारांनीच केले, कारण पुढील अनेक वर्षे या खात्यावर त्यांचेच नियंत्रण होते, असे ते म्हणाले. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष हे दोन्ही मोठे महाचोर ▶▶ पान २ वर



# प्रयागराज मेळ्यात पुन्हा भीषण आग

प्रयागराज । प्रतिनिधी

प्रयागराज माघ मेळयात सलग दुसऱ्या दिवशी आग लागली असून बुधवारी संध्याकाळी ब्रम्हा आश्रम शिबिरात अचानक आग लागली. जोरदार वाऱ्यामुळे आगीच्या ज्वाळांनी २ मोठ्या शिबिरांना वेढले. यामुळे १० हून अधिक तंबू जळून खाक झाले. कल्पवासियांनी पळून जाऊन आपला जीव वाचवला. ▶▶ पान २ वर

# नीट पीजी कट-ऑफमध्ये मोठी कपात

## १८ हजार रिक्त जागांसाठी आता ० ते ७ पर्सेंटाइलधारकांनाही मिळणार प्रवेश!

दिल्ली । वृतसंस्था

**वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या 'नीट–पीजी'(नीट पीजी) परीक्षेच्या पात्रता गुणांमध्ये (कट–ऑफ)मोठी सुधारणा करण्यात आली आहे. तब्बल १८ हजार जागा रिक्त राहिल्याने नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सेसने(एनबीईएमएस) कट–ऑफ चक्क 'शून्य' आणि '७' पर्सेंटाइलपर्यंत खाली आणला आहे. या निर्णयामुळे आता ८०० पैकी वजा ४० (–४०) गुण मिळवणारे उमेदवारही एमडी आणि एमएस कोर्सेसच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहेत.**



पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाच्या (एमडी/एमएस) जागा रिक्त राहू नयेत, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. पहिल्या दोन फेऱ्यांनंतर अनेक जागा रिक्त राहिल्या आहेत, तसेच काही नवीन जागांची भर पडली आहे. या जागा भरण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवारांना संधी मिळावी म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. एकीकडे कमी गुण असलेल्या उमेदवारांमध्ये आनंदाचे वातावरण असले, तरी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी या निर्णयावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. तज्ज्ञांच्या मते, कट–ऑफ थेट शून्यावर आणल्यामुळे वैद्यकीय शिक्षणाचा ▶▶ पान २ वर

# अनेक लाडक्या बहिणी लाभापासून वंचित

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा नोव्हेंबर आणि डिसेंबरचा हप्ता वर्ग करण्यात आल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे; मात्र अजूनही राज्यातील अनेक लाडक्या बहिणींना नोव्हेंबर आणि डिसेंबरचे पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे या लाडक्या बहिणी नाराज झाल्या आहेत. लाडकी बहीण योजनेची केवायसी करण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर २०२५ इतकी होती. पण केवायसी करून देखील नोव्हेंबर आणि डिसेंबरचे पैसे अनेक लाडक्या बहिणींना मिळाले नाहीत.



राज्यात अनेक लाडक्या बहिणींनी केवायसी करून देखील त्यांना योजनेचे पैसे मिळाले नाहीत. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, आम्ही पात्र लाडक्या बहिणींना नोव्हेंबर आणि डिसेंबरचे दोन हप्ते वर्ग केले आहेत. महापालिका निवडणूक मतदानाच्या आधीच पात्र ▶▶ पान २ वर


# अनुदानित खत नाकारल्यास होणार कारवाई

पुणे । पतिनिधी

**रासायनिक खतांच्या पुरवठ्याच्या बदल्यात विनाअनुदानित (नॉन–सबसिडी) उत्पादने सक्तीने खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या 'लिंकिंग' प्रकाराविरोधात महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाईड, सीडस्? डीलर्स असोसिएशन (माफदा) आक्रमक झाली आहे.**

लिंकिंग न करणाऱ्या कंपन्यांचेच खत स्वीकारण्याचा ठाम निर्णय 'माफदा'ने घेतला असून, राज्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी कोणत्याही परिस्थितीत लिंकिंग स्वीकारू नये, असे स्पष्ट आवाहन संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

फर्टिलायझर असोसिएशन ऑफ



इंडिया, नवी दिल्ली यांच्या वतीने प्रसारित करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकात खत विक्रीसोबत विनाअनुदानित उत्पादने लिंकिंगने विकली जात नसल्याचा दावा करण्यात आला होता. तसेच शेतकऱ्यांनी अशा प्रकारांना बळी पडू नये, असे आवाहनही करण्यात आले होते. मात्र, या प्रसिद्धीपत्रकामुळे शेतकरी व खत विक्रेते ▶▶ पान २ वर

# छत्तीसगडमध्ये २९ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

सुकमा । वृत्तसंस्था

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात नक्षलवाद निर्मूलन मोहिमेअंतर्गत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. वाढत्या दबावासह राबविण्यात आलेल्या प्रभावी रणनीतींमुळे २९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. हा घटनाक्रम परिसरात शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ▶▶ पान २ वर

# आता भारत ५५ देशांमध्ये व्हिसा-मुक्त

नवी दिल्ली । वृतसंस्था

भारताच्या पासपोर्टने आणखी प्रगती केली असून जागतिक स्तरावर पासपोर्टच्या शक्तीमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. या वर्षी आशियाई देशांचे वर्चस्व कायम आहे. सिंगापूरचा पासपोर्ट जगातील सर्वात शक्तिशाली राहिला आहे, हा १९२ देशांमध्ये व्हिसा–मुक्त प्रवास करण्याची परवानगी देतो. त्यानंतर जपान आणि दक्षिण कोरिया आहेत. दरम्यान, संयुक्त अरब अमिराती या वर्षी विशेषतः




प्रमुख आहे, पाचव्या स्थानावर पोहोचले आहे.

भारताच्या पासपोर्ट रँकिंगमध्येही सुधारणा झाली आहे. भारताने पाच स्थानांनी प्रगती करत अल्जेरियाशी बरोबरी करत ८० व्या स्थानावर पोहोचला आहे. भारतीय नागरिक ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १६.०० क्विंटल | २,३९० | ३,२५१ | २,६३३ |
| ज्वारी/हायब्रिड: ३४.०० क्विंटल | २,००१ | ३,६६० | २,९०९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८७.०० क्विंटल | ६,३०० | ७,२२० | ६,८५२ |
| उडीद :७.५० क्विंटल | ४,४०० | ६,००० | ५,२०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,४५० | ३,११० | २,८४७ |
| मुग: १३.५० क्विंटल | ६,४१० | ७,७०२ | ६,९८७ |
| सोयाबीन: २७.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,००० | ५,१५१ | ४,७७० |

# भूखंड घोटाळ्याप्रकरणी खडसेंना झटका?

मुंबई । प्रतिनिधी

**भोसरी एमआयडीसी भूखंड घोटाळा प्रकरणात माजी महसूलमंत्री एकनाथ खडसे यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात विशेष न्यायालयाने दोषारोप निश्चितीच्या प्रक्रियेला स्थगिती द्यावी, अशी विनंती खडसे यांच्याकडून करण्यात आली होती. मात्र, उच्च न्यायालयाने ही मागणी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावत कोणतीही अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला आहे.**

न्यायालयाने आपल्या आदेशात याचिकेतील विलंबाकडे विशेष लक्ष वेधले. दोषारोप निश्चितीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी याचिका दाखल करण्यात उशीर झाल्याचे नमूद करत, अशा परिस्थितीत हस्तक्षेप करणे योग्य नसल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले. त्यामुळे विशेष न्यायालयाच्या कार्यवाहीस अडथळा आणण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. या निर्णयानंतर आता येत्या १६ जानेवारी रोजी विशेष न्यायालयात



एकनाथ खडसे, त्यांची पत्नी मंदाकिनी खडसे तसेच जावई गिरीश चौधरी यांच्याविरोधात औपचारिकरित्या आरोप निश्चित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आरोप निश्चित झाल्यानंतर या प्रकरणाच्या सुनावणीला वेग येण्याची शक्यता असून, खडसे यांच्यासाठी ही बाब कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे. ▶▶ पान २ वर

### काय आहे प्रकरण?

भोसरी येथील एमआयडीसी परिसरातील कथित भूखंड घोटाळा प्रकरण गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. या प्रकरणात माजी महसूलमंत्री एकनाथ खडसे, त्यांची पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांच्यावर गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. प्रकरणात आर्थिक आणि प्रशासनिक नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला असून, त्यामुळे या प्रकरणाचे महत्व फक्त कायदेशीरच नव्हे तर राजकीय दृष्टिकोनातूनही अधोरेखित झाले आहे.

cmyk

## अग्रलेख

# कोणीही कोणाच्याही गळ्यात पडणार...!

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारयुद्धाची सांगता होत असताना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची घोषणा झाल्याने मतसंग्रामाचा पुढचा टप्पाही आता सुरू झाल्याचे दिसते. मागची दीड ते दोन वर्षे देश वा राज्यवासियांसाठी प्रामुख्याने 'इलेक्शन फिव्हर'चीच ठरली आहेत. २०२४ मध्ये लोकसभा, २०२५ मध्ये विधानसभा व नगरपरिषदेच्या निवडणुकांनी महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून निघाले. तर मागच्या काही दिवसांपासून महानगरपालिका निवडणुकांमुळे मुंबईपासून नागपूरपर्यंत आणि पुण्यापासून जळगावपर्यंत राज्यातील महानगरांमधील राजकीय वातावरणाचा पार चढला आहे. राज्यात भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट यांची युती असली, तरी महापालिका स्तरावर काही अपवाद वगळता हे पक्ष स्वतंत्रपणे लढताना दिसतात. मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, वसई विरार यांसारख्या महापालिकांमध्ये भाजप व शिंदे सेना एकत्र असले, तरी नवी मुंबई, उल्हासनगर, मीरा भाईंदर यांसारख्या ठिकाणी हे दोन्ही पक्ष आमनेसामने आहेत. यातील राजधानी मुंबईतील निवडणूक ही अतिशय प्रतिष्ठेची मानली जाते. भाजप–शिंदेसेना विरुद्ध ठाकरेसेना–मनसे युतीमध्ये काट्याची टक्कर असल्याचे दिसते. तर पुणे व पिंपरी–चिंचवड महापालिकेत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी असा सामना आहे. त्यामुळे हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महापालिका सोडल्या, तर इतर ठिकाणी विरोध पक्ष बाजूलाच पडला आहे. सत्ताधाऱ्यांच्या रणनीतीचाही हा एक भाग असू शकतो.

मुळात भाजप, सेना व राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांची राज्यात युती आहे. त्यामुळे गरज भासली, तरी महापालिकेतही ते एकत्र येऊ शकतात. भाजपचा महापौर व राष्ट्रवादीचा किंवा सेनेचा स्थायी समिती अध्यक्ष असे चित्र पहायला मिळाले, तरी आश्चर्य वाटून घ्यायचे कारण नाही. सध्याच्या राजकारणात विरोधी पक्षाचेही कुणाला वावडे राहिलेले नाही. अंबरनाथ, अकोटमधील विळ्याभोपळ्याचे सख्य उभ्या महाराष्ट्राने पाहिलेच आहे. त्यामुळे उद्या जागा कमी पडल्या, तर कुणालाही गळाला लावले जाऊ शकते. महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवारी १५ जानेवारीला मतदान, तर १६ जानेवारीला मतमोजणी होईल. लोकसभा, विधानसभेप्रमाणे या निवडणुकीतही टक्का महत्त्वाचा असेल. हा टक्का वाढविण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष कामाला लागलेले दिसतात. लोकशाहीमध्ये मतदान हे पवित्र कर्तव्य मानले जाते. एकूण देशातील, राज्यातील वातावरण लोकशाहीच्या दृष्टीने कितीही नकारात्मक वा निराशाजनक असले, तरी प्रत्येकाने मतदान करायलाच हवे. परंतु, ज्या सुशिक्षित समाजाकडून आपण अपेक्षा बाळगतो, तोच समाज मताधिकार बजावण्यासाठी हात आखडता घेतो. याला पक्षातील फोडाफोडी, पैशाचा बाजार या गोष्टीही कारणीभूत असल्या, तरी मतदान न करणे, हा त्यावर उपाय नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. मतदान आणि प्रलोभन हे तर समीकरणच. आपल्याला हवे तसे मतदान घडवून आणण्यासाठी अनेक पक्ष वा उमेदवार मतदारांना विविध प्रलोभने दाखवतात. अगदी पैशापासून भेट वस्तूंपर्यंतच्या कितीतरी गोष्टींचा त्यात समावेश होतो. महापालिका निवडणुकीतील लक्ष्मीदर्शन पाहिले, तर कुणाचेही डोळे विस्फारतील, अशी परिस्थिती आहे. एका मताला पाच ते सात हजार रुपये इतका भाव फुटत असेल, तर मतांचे गणित समजून घ्यायला पाहिजे. पैसा खर्च केल्याशिवाय निवडणूक जिंकता येत नाही, अशी बहुतेक राजकारण्यांची धारणा होऊन बसली आहे. त्यामुळे मतदारराजा खरोखरच भ्रष्ट झाला आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर सरसकट होय किंवा नाही, असे देता येणार नाही. परंतु, पैसे घेऊन मतदान करण्याचा ट्रेंड सध्या मोठ्या प्रमाणात वाढला आहे, हे मान्य करायला हवे. लोकशाहीसाठी हे घातकच होय. नेतृत्व हे सर्वसामान्यांमधून, लोकांमधून येणे अपेक्षित असते. परंतु, हे सगळे पैशावर ठरवले गेले, तर सर्वसामान्य नेतृत्व पुढेच येऊ शकणार नाही. याचा राजकीय पक्ष व लोक सर्वांनीच विचार केला पाहिजे. पाण्यासारखा पैसा खर्च करणारे उमेदवार निवडून आल्यावर काय करतात, हे नव्याने कुणाला सांगण्याची गरज आहे. परंतु, हे सर्व ज्ञात असूनही मतदार म्हणून या सर्वाला आपण प्रोत्साहन देणार असू, तर त्यातून मतांचा बाजार उठण्याशिवाय आणखी काही होणार नाही. हे पाहता महापालिका निवडणुकीत चारित्र्यवान, सुसंस्कृत, सुशिक्षित उमेदवार निवडून देण्यास लोकांनी प्राधान्य दिले पाहिजे. महापालिकांपाठोपाठ जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकाही जाहीर झाल्या आहेत. ५ फेब्रुवारी रोजी या निवडणुकांसाठी मतदान होणार आहे. यामध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशीव, लातूर, परभणी या जिल्ह्यांचा समावेश आहे. ७ फेब्रुवारीला निकाल जाहीर होणार असून, या निकालाकडेही राज्याचे लक्ष असेल. तसे पाहिल्यास प्रत्येक निवडणुकीत भाजपा क्रमांक एकवर आहे. परंतु, झेडपी व पंचायत समितीतील यशाबद्दल भाजपच्या मनात साशंकता होती. मात्र, नगरपरिषद व महापालिका निवडणुकातील यशानंतर झेडपी निवडणुकांवर प्रभाव टाकण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या दोन्ही टप्प्यात प्रामुख्याने महायुतीमध्येच लढती झाल्याचे दिसून येते. झेडपी, पंचायत समिती निवडणूकही त्याच पातळीवर नेण्याची रणनीती भाजप धुरिणांकडून आखली जाईल, हे वेगळे सांगायला नको. खरे तर मागच्या दोन महिन्यांतील निवडणूकमय वातावरणामुळे राज्यातील बरेच महत्त्वाचे प्रश्न बाजूला पडले आहेत. झेडपी इलेक्शनमुळे राज्याचे रणांगण पुन्हा तापायची चिन्हे असल्याने हे प्रश्न आणखी काही काळ तसेच राहू शकतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेवरील आपली पकड घट्ट केली आहे. तर अजित पवार व एकनाथ शिंदे यांनीही आपले स्थान कायम राखले आहे. पुढच्या निवडणुकात आपली मांड हे तिन्ही नेते अधिक पक्की करतील, हे वेगळे सांगायला नको. तरीही अद्याप राज्यातील महायुती सरकार म्हणावे तशी छाप पाडू शकलेले नाही, हेही तितकेच खरे आहे. मतमतांच्या या गलबल्यातून बाहेर येऊन यापुढे तरी लोकहिताला प्राधान्य मिळावे, हीच अपेक्षा.

# परळी पत्रकार परिषदेच्या वतीने उद्या दर्पण व मूकनायक पुरस्काराचे वितरण

**परळी वै. । प्रतिनिधी**

**पत्रकारितेच्या क्षेत्रात नि:स्वार्थपणे कार्यरत राहून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या पत्रकारांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न परळी पत्रकार परिषद यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त दिले जाणारे विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. दि. १६ जानेवारी २०२६ शुक्रवार रोजी कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत दर्पण व मूकनायक दिनानिमित्त आदर्श पत्रकारिता पुरस्काराचे वितरण सकाळी १० वा. करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषद शाखा परळीचे तालुका कार्याध्यक्ष आत्मलिंग शेटे, तालुकाध्यक्ष धीरज जंगले व शहराध्यक्ष किरण धोंड यांनी दिली आहे.**

दर्पण व मूकनायक दिनानिमित्त आयोजित पुरस्कार वितरण कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, शिवसेनेचे राज्य समन्वयक फुलचंद कराड, जिल्हाधिकारी विवेक जॉनसन, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, परळी नगरीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, मुख्य वक्ते प्रसिद्ध विचारवंत तथा लेखक, संपादक यमाजी मालकर, मार्गदर्शक जेष्ठ पत्रकार शंकर आप्पा मोगरकर अनंत भातांगळे मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय संघटक सुभाष चौरे, मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, बीड जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे, माऊंट लिटरा स्कूलचे उपाध्यक्ष कैलास घुगे, औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, रिपाईचे युवक नेते सचिन कागदे, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष जुगल किशोर लोहिया, माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, महिला महाविद्यालयाचे सचिव संजय देशमुख, अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचे जनसंपर्क अधिकारी कुलदीप खोब्रागडे, परळी नपचे गटनेते प्रा पवन मुंडे, माजी नगरसेवक राजा खान, नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, नगरसेवक महादेव रोडे, गटशिक्षणाधिकारी गणेश गिरी, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन आदी मान्यवरांच्या उपस्थितीत आदर्श पत्रकार पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. मराठी पत्रकार परिषद ही पत्रकारांची मातृसंस्था म्हणून ओळखली जाते. मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त श्री. शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उपाध्यक्ष गणेशजी मोकाशी, राज्य महिला आघाडी अध्यक्ष श्रीमती शोभा जयपूरकर, राज्य प्रसिध्दीप्रमूख संदीप कुलकर्णी, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, छत्रपती संभाजीनगर चे विभागीय सचिव मा.श्री. रवी उबाळे, राज्य कार्यकारिणी सदस्य मा. श्री. विलास डोळसे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हाध्यक्ष विशालसाळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक मा.श्री. दत्ताजी अंबेकर, हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक अभिमन्यू घरत, जिल्हा प्रसिद्ध प्रमुख संजय हंगे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी पत्रकार परिषद सतत उपक्रमशील कार्यक्रम राबवत आली आहे. दर्पण व मूकनायक दिनाच्या निमित्ताने पुरस्कार प्राप्त पत्रकारांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच परळीतील संपादक बांधवांचाही सत्कार यानिमित्ताने करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास परळी शहर व तालुक्यातील संपादक व पत्रकार बांधव, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे सर्व पदाधिकारी, सदस्य, डिजिटल मीडिया परिषदेचे पदाधिकारी, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे. असे आवाहन मराठी पत्रकार परिषद शाखा परळीचे तालुका कार्याध्यक्ष आत्मलिंग शेटे, तालुकाध्यक्ष धीरज जंगले व शहराध्यक्ष किरण धोंड यांनी केले आहे.

### या पत्रकारांचा होणार पुरस्कार देऊन सन्मान

रामप्रसाद शर्मा (दैनिक पार्श्वभूमी) जीवनगौरव पुरस्कार, रवींद्र जोशी (दैनिक पुढारी)दर्पण पुरस्कार, मिलिंद चोपडे (दैनिक लोकाशा)दर्पण पुरस्कार, स्वानंद पाटील (एबीपी माझा न्यूज मराठी) दर्पण पुरस्कार, दत्तात्रय काळे (दैनिक आधुनिक केसरी) मूकनायक पुरस्कार, सुकेशनी नाईकवाडे (महाराष्ट्र टाइम्स न्यूज चॅनल) मूकनायक पुरस्कार, संभाजी मुंडे (टीव्ही नाईन मराठी)मूकनायक पुरस्कार देऊन वरील पत्रकारांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात येणार आहे.

# सतत मूड बदलण्याची 'ही' वैज्ञानिक कारणं-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

आजच्या धावपळीच्या जीवनात बहुतेक लोक तणावाचे बळी ठरत आहेत. कामाचा ताण, आर्थिक अडचणी, नात्यांमधील समस्या, कौटुंबिक वाद अशा अनेक कारणांमुळे तणाव वाढतो, पण काही लोकांचा मूड क्षणाक्षणाला बदलत असतो, ज्याला आपण मूड स्विंग्स म्हणतो, अशावेळी चिडचिडेपणा जाणवू लागतो आणि हे असे का होत आहे. हेच समजत नाही. कधी कुणाशी बोलावंसं वाटतं, तर दुसऱ्याच क्षणी बोलायची इच्छा होत नाही. अचानक राग येतो, तर कधी तुम्ही खूप प्रेमाने वागता. अनेकदा लोकांना ही परिस्थिती समजत नाही, पण तुमच्या शरीरात किंवा वागणुकीत होणाऱ्या कोणत्याही बदलामागे एक वैज्ञानिक कारण नक्कीच असते. मूड खराब होण्यामागे नेमकी कोणती वैज्ञानिक कारणे आहेत. याबाबत तज्ञांनी सांगितलेली ही काही महत्त्वाची कारणे.

सेरोटोनिन आणि



डोपामाईलची पातळी: डे दोन्ही मेंदूतील फॉल–गुड हार्मोन्स म्हणून ओळखले जातात, तणाव, अपुरी झोप किंवा चुकीच्या आहारामुळे या हार्मोन्सची पातळी कमी झाल्यास मूड खराब होऊ शकतो., अपुरी झोप: जेव्हा आपल्याला पुरेशी झोप मिळत नाही, तेव्हा मेंदूला आराम मिळत नाही. यामुळे चिडचिड, थकवा आणि राग येणे स्वाभाविक आहे., हार्मोनल बदल : विशेषतः महिलांमध्ये मासिक पाळी, गर्भधारणा किंवा मेनोपॉजच्या काळात हार्मोन्समध्ये मोठे बदल होतात है बदल थेट त्यांच्या मूडवर परिणाम करतात., चुकीचा आहार : जर तुम्ही तुमच्या आहारात जास्त साखर, प्रक्रिया केलेले पदार्थ किंवा कॅफीन घेत असाल, तर रक्तातील साखरेची पातळी वेगाने कमी–जास्त होते याचा थेट परिणाम आपल्या मूडवर होतो., व्हिटॅमिन डीची कमतरताः पुरेसा सूर्यप्रकाश न मिळाल्यास शरीरात व्हिटीमन डीची कमतरता निर्माण होते. यामुळे मेंदूतील सेरोटोनिनची निर्मिती कमी होते आणि नैराश्यासारखी भावना येऊ शकते, ज्यामुळे तुमचा मूड सतत खराब राहतो., चिंता आणि तणाव : सतत चिंता किंवा तणावाखाली राहिल्याने शरीरात कॉर्टिसोल नावाचा स्ट्रेस हार्मोन वाढतो. हा हार्मोन मेंदूला थकवतो आणि मूड खराब करतो. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

# तळवट बोरगाव शाळेचा फन फेअर ठरला विद्यार्थ्यांसाठी व्यवसायाची शाळा; उपक्रम विक्री आणि मार्केटिंगचा घेतला अनुभव

**बीड । प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून प्रत्यक्ष व्यवहारी व व्यावसायिक कौशल्यांची जोड आवश्यक आहे. याच विचारातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव केंद्र पाचेगाव तालुका गेवराई शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला वार्षिक फन फेअर हा विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने व्यवसायाची शाळा ठरला. शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांची विविध स्टॉल लावले होते. या स्टॉलसाठी गावातील पालकांनी आणि ग्रामस्थांनी उदंड प्रतिसाद दिल्याने याला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष व्यवहार विक्री आणि मार्केटिंगचा अनुभव घेतला. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले छोटे बाल विद्यार्थी..! वेगवेगळ्या वेशभूषेमध्ये आणि विविध रंगानी रंगवलेल्या आकर्षक चेहऱ्यांनी आणि विविध आकाराच्या घातलेल्या टोप्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. या छोट्या विद्यार्थ्यांसोबतच शाळेतील शिक्षकही विविध रंगांनी आकर्षक चेहरे रंगून या छोट्या विद्यार्थ्यांमध्ये लहानपणीचा आनंद घेत मिसळले होते.

विशेष म्हणजे या फन फेअरमध्ये विद्यार्थ्यांनी उभारलेल्या स्टॉलमध्ये विद्यार्थ्यांनी घरी तयार केलेल्या पदार्थांचा समावेश करण्यात आलेला होता. यामध्ये भेळ, भजी, पाणीपुरी, आप्पे, मसाला पापड, इडली सांबर, वडापाव, पोहे, मॅगी नूडल्स, चहा, मसाला दूध, आपल्या शेतात पिकलेल्या विविध पालेभाज्या, मोसंबी, आलू पराठे, अननस, खारे शेंगदाणे, पेरू, पपई, बोर, शेंगदाणा चिक्की, अशा विविध पदार्थ विक्रीसाठी स्टॉलवर ठेवण्यात आले होते. या सर्व पदार्थांची तयारी, किंमत ठरवणे, स्टॉल सजावट, ग्राहकांशी संवाद, विक्री व हिशोब ठेवणे ही सर्व कामे विद्यार्थ्यांनी स्वतः पार पाडली. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उभारलेल्या स्टॉलला गावातील प्रथम नागरिक सरपंच सौ.अलका नंदू गाडे, नंदू अण्णा गाडे, पोलीस पाटील सुदाम पाटील गाडे,ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच सदस्य,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल भैया गाडे, अमोल घोलप, हभप गिरी महाराज, शिक्षणप्रेमी अनंत घोलप,दिगंबर गाडे, युवा नेते नारायण भैय्या गाडे, रामकिसन राऊत, ट्रेनी शिक्षक पालक किरण गाडे,यासह पालक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने भेट दिली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध स्टॉलला भेट देत सर्वच पदार्थांची खरेदी केली.यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहार, ग्राहक समाधान, नफा तोटा, व्यवसायाचे शिक्षण प्रत्यक्ष स्वानुभवातून घेता आले. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना स्टॉल, आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले होते, शाळेच्या उत्कृष्ट नियोजनामुळे कुठेही गोंधळ न होता कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडला. फन फेअर हा केवळ मनोरंजनाचा उपक्रम न राहता या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ करणारा आणि उद्योजकतेकडे नेणारा उत्तम मंच ठरला. शाळेतील आयोजित आनंद नगरी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत कुलथे तसेच सहशिक्षक धर्मेंद्र गोरे आणि अंबिलवादे आर. व्ही. यांनी विशेष परिश्रम घेतले.

जिल्हा परिषद तळवट बोरगाव शाळेत आयोजित फन फेअरमुळे शाळेतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचे धडे आनंददायी व स्वानुभवातून मिळाले. शाळेमध्ये शालेय शिक्षणासोबतच व्यावसायिक शिक्षण आणि तेही आनंददायी वातावरणात मिळत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील शाळेविषयीची अनाहूत भीती कमी होऊन शाळेतील विद्यार्थी उपस्थितीचे प्रमाण देखील वाढले आहे.

**–सौ.अलका नंदू गाडे**
**सरपंच, तळवट बोरगाव**

शाळेमध्ये केवळ पुस्तकी ज्ञानच आवश्यक नाही तर त्या पुस्तकी ज्ञानाला जर व्यवहारी ज्ञानाचे सहाय्य मिळाल्यास विद्यार्थी स्वानुभवातून शिकतात. शाळेतील ज्ञानाचा व्यवहारात उपयोग कसा करावा याचे प्रत्यक्ष ज्ञान अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना देता येते. अशा उपक्रमामुळे शाळा ही केवळ ज्ञान देणारी शाळा न राहता प्रत्यक्ष व्यवहाराचा शालेय शिक्षणाशी सांगड घालणारे केंद्र बनते.

**–शशिकांत कुलथे**
**मुख्याध्यापक , प्रा. शाळा तळवट बोरगाव**

## पान १ वरून...

### फळबाग अनुदान विचारले

रखडल्याचं त्यांचं म्हणण आहे. यादरम्यान, मंगरुळपीरचे तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे हे गोगरी शिवारात पाहणी करण्यासाठी गेले असता, पवार यांनी त्यांच्याकडे रखडलेल्या अनुदानाबाबत विचारणा केली. आरोपानुसार, जाब विचारत असताना तालुका कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्याच्या अंगावर धाव घेत चक्क बुटाने मारहाण केली. याशिवाय, शेतातील मातीची ढेकळे उचलूनही पवार यांना मारल्याचा आरोप करण्यात आला आहे काँग्रेस नेते आणि आमदार नाना पटोले यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलंय की, ''देवेंद्र फडणवीस यांचे सरकार शेतकरीविरोधी आहे. राज्याचे कृषिमंत्री म्हणतात, भिकारी सुद्धा एक रुपयाची भीक घेत नाही, पण एक रुपयात विमा सरकार देते; दुसरे आमदार म्हणतात, शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबाला अंगावरचे कपडे आणि पायातील चप्पल आम्ही देतो आणि मुजोर सरकारी अधिकारी शेतकऱ्यांच्या अंगावर धावून जात बुटाने मारहाण करतात. वाशिम जिल्ह्यातील गोगरी परिसरात मनरेगा योजनेअंतर्गत संत्रा फळबाग अनुदान रखडल्याबाबत विचारणा केल्याने एका शेतकरी बांधवाला झालेली मारहाण ही अत्यंत संतापजनक घटना आहे.या मुजोर अधिकाऱ्याने शेतकऱ्याला ''तुला गुन्ह्यात अडकवीन'' अशी धमकी देत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

------------------

### प्रयागराज मेळ्यात

ब्रम्हा आश्रम शिबिर सेक्टर ४ च्या खालच्या मार्गावर आहे. उंच उठणाऱ्या ज्वाळांसोबत धूर सुमारे ५ किलोमीटर दूरून दिसत होता. अग्निशमन दलाच्या पथकांनी पाण्याचा फवारा मारून आगीवर नियंत्रण मिळवले. या दरम्यान, आग अधिक पसरू नये म्हणून संपूर्ण परिसर सील करण्यात आला. सर्वात आधी पोलिस आणि संतांनी बचाव कार्य सुरू केले. त्यानंतर १० अग्निशमन दले आणि १० रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या. ३० अग्निशमन कर्मचा–यांनी लोकांना दुस–या ठिकाणी हलवले. तंबूमधील कल्पवासियांचे सामान जळून खाक झाले. कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही.

---------------

### पवारांचा भ्रष्टाचार

आहेत. ते एकमेकांचा भ्रष्टाचार झाकत असतात. अजित पवारांचा भ्रष्टाचार फडणवीस आणि मोदींनी झाकला आहे, आणि आता ही सर्व लुटारूंची टोळी मांडीला मांडी लावून बसली आहे. अधिकारी, पुढारी आणि कॉन्ट्रॅक्टर या तिघांच्या संगणमताने महाराष्ट्राला लुटले जात आहे. चितळे कमिटीने हाय पॉवर कमिटी नेमून चौकशी करण्याची शिफारस केली होती आणि सरकारने ती स्वीकारली होती, तरीही प्रत्यक्षात हे सर्व दाबण्याचे काम झाले असून फडणवीसांनी क्लीन चिट दिली आहे.

-----------------

### नीट पीजी कट–ऑफमध्ये

दर्जा खालावण्याची शक्यता आहे. ''हा निर्णय वर्षानुवर्षे मेहनत करणाऱ्या गुणवंत डॉक्टरांवर अन्यायकारक असून, याचा सर्वाधिक फायदा खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांना होईल. अत्यंत कमी किंवा उणे गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रवेश दिल्यास, भविष्यात वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा आणि रुग्णसेवेवर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. 'नीट–पीजी' २०२५ ची परीक्षा ३ ऑगस्ट रोजी झाली होती आणि निकाल १९ ऑगस्टला जाहीर झाला होता. कौन्सेलिंगच्या पहिल्या दोन फेऱ्या ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान पार पडल्या. आता मेडिकल कौन्सेलिंग कमिटी (एमसीसी) लवकरच तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहिर करण्याची शक्यता आहे.

--------------

### अनेक लाडक्या बहिणी

महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. दरम्यान, दोन महिन्यांचे एकत्रच पैसे जमा करण्यात येणार होते. परंतु, अग्रिम रक्कम जमा करण्यास निवडणूक आयोगाने मज्जाव केल्याने सरकारने केवळ डिसेंबर महिन्याचा निधी वितरित केला आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या वेळी लाडकी बहीण योजनेतील दोन हप्ते एकत्र देण्यात आले होते. त्यामुळे विरोधकांकडून टीका करण्यात आली होती. यावेळीही नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचा निधी एकत्र वितरित करण्यात येणार होता. मात्र, विरोधकांनी त्यावर आक्षेप घेतला. त्यानुसार, सरकारने आता फक्त नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचा नियमित हप्ता पाठवला आहे. जानेवारी महिन्याचा हप्ता पाठवण्यात आलेला नाही.

-------------

### आता भारत ५५ देशांमध्य

आता ५५ देशांमध्ये पूर्व व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात. यामध्ये व्हिसा–मुक्त, व्हिसा–ऑन–अरायव्हल आणि इलेक्ट्रॉनिक ट्रॅव्हल ऑथोरायझेशन सुविधांचा समावेश आहे. गेल्या वर्षी भारत ८५ व्या स्थानावर होता. या अहवालातून भारताच्या पासपोर्टची ताकद हळूहळू वाढत आहे आणि भविष्यात भारतीयांसाठी आंतरराष्ट्रीय प्रवास सोपा होऊ शकतो असे दिसत आहे. या वाढीव सुविधेचा फायदा आशिया, आफ्रिका, ओशनिया, कॅरिबियन आणि मध्य पूर्वेतील अनेक भागांमधील भारतीय प्रवाशांना होईल. लोकप्रिय व्हिसा–मुक्त देशांमध्ये थायलंड, मलेशिया, मॉरिशस, नेपाळ, बार्बाडोस, फिजी, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स आणि इतर समावेश आहेत. व्हिसा–ऑन–अरायव्हल देशांमध्ये इंडोनेशिया, मालदीव, श्रीलंका, केनिया, जॉर्डन आणि फिलीपिन्स यांचा समावेश आहे.

-------------

### छत्तीसगडमध्ये २९ नक्षलवाद्यांचे

मानले जात आहे. सुकमाचे पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितले की, हे सर्व नक्षलवादी प्रतिबंधित सीपीआय (माओवादी) संघटनेच्या आघाडीच्या संघटनांचे सक्रिय सदस्य होते. गोगुंडा भागातील माओवाद्यांची संघटनेचा प्रमुख पोडियाम बुध्रा याच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस होते. गोगुंडा कॅम्पची स्थापना झाल्यानंतर या भागात सुरक्षा दलांची उपस्थिती लक्षणीयरीत्या वाढली. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले. सुरक्षा दलांकडून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या शोधमोहीम, क्षेत्रीय वर्चस्व (एरिया डॉमिनेशन) आणि इतर दबावात्मक उपाययोजनांमुळे प्रभावित होऊन या नक्षलवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडत समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, नववर्षांत ८ जानेवारी रोजी दंतेवाडा जिल्ह्यात ६३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते, तर ७ जानेवारी रोजी सुकमामध्ये २६ नक्षलवाद्यांनी हिंसाचार सोडून मुख्य प्रवाहात प्रवेश केला होता. २०२५ मध्ये राज्यात १५०० हून अधिक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते.

-----------------

### अनुदानित खत नाकारल्यास

यांच्यात गैरसमज निर्माण होत असल्याचा आरोप माफदाने केला आहे. माफदाने फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया यांना सविस्तर खुलासा पत्र पाठविले आहे. या पत्रात मागील काही वर्षांत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषिमंत्री तसेच वरिष्ठ कृषी अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठका आणि पत्रव्यवहाराचा संदर्भ देत खत उत्पादक कंपन्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. संघटनेने आरोप केला आहे की, काही खत उत्पादक कंपन्यांकडून विनाअनुदानित उत्पादने न घेतल्यास खतांचा पुरवठा थांबविण्याची किंवा रेल्वे रॅक इतर जिल्ह्यात वळविण्याची तोंडी धमकी दिली जात आहे. मात्र, केंद्र शासनाकडून राज्यनिहाय व जिल्हानिहाय खत पुरवठ्याचा आराखडा मंजूर होत असून, त्या आराखड्यानुसार पुरवठा करणे कंपन्यांवर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे, असे माफदाने स्पष्ट केले आहे.

**'लिंकिंग' कायद्याने गुन्हा**

लिंकिंग प्रकारामुळे खत विक्रेत्यांचे परवाने निलंबित किंवा रद्द होण्याचा धोका असल्याने, माफदाने सर्व विक्रेत्यांना लिंकिंग न स्वीकारण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. कोणतीही कंपनी खतांसोबत विनाअनुदानित उत्पादने सक्तीने लादत असल्यास त्याविरोधात संघटनेकडे लेखी तक्रार करण्याची कार्यपद्धतीही माफदाने जाहीर केली आहे.

----------



# हिंद–की–चादर' अंबड नगर परिषदेची बैठक संपन्न

**अंबड । प्रतिनिधी**

नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी होणाऱ्या 'हिंद–की–चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त अंबड नगर परिषदेत आज मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या अध्यक्षेत बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीत जिल्हाधिकारी यांनी 'हिंद की चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिलेल्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार चर्चा करुन नांदेड येथील कार्यक्रमासाठी अंबड शहरामार्फत तसेच प्रशासनामार्फत कोणत्या सेवा देता येईल याबाबतचे नियोजनासाठी चर्चा करण्यात आली. यावेळी बैठकीस नगर परिषद प्रशासनातील अधिकारी यांच्यासह विविध समाजातील प्रतिनीधी यांची उपस्थिती होती.


## थोडक्यात



माजलगाव:- लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि,सुदंरनगर चे कार्यालयात स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रतिमेचे पुजन करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड,समवेत बळीराम निपटे,नानासाहेब वाघचौरे,बालाजी सुरवसे,महादेव मुरकुटे,नागोराव निर्मळ,ज्ञानेश्वर ठोंबरे,अंकुश देशमुख,बाशिंबे मामा

## प्रविण काळम-पाटील यांची गेवराई गटशिक्षणाधिकारीपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी



गेवराई येथिल गटशिक्षणाधिकारी पदी उपक्रमशील विस्तार अधिकारी प्रवीणश्रीराम काळ म-पाटील यांची नियुक्ती मुख्यकार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दि१४ जानेवारी रोजी केली आहे.३० डिसेंबरला तत्कालीन प्रभारी गटशिक्षणाधिकारी विठ्ठल राठोड हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले होते,त्यांच्या सेवानिवृतीमुळे सदर पद रिक्त झाले होते.

## योगासन व प्राणायाम शिबिरास व सामूहिक हवनासही मिळाला उस्फूर्त प्रतिसाद



किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर शहरामध्ये योगागुरु आचार्य स्वामी देववृत्तजी सरस्वती यांच्या प्रमुख उपस्थितीत योगासन व प्राणायाम शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिरास उस्फूर्त असा प्रतिसाद मिळाला व दैनंदिन उपस्थिती ही मोठी होती या निमित्ताने एक दिवशीय हवनाचे ही सामुदायिक आयोजन परळी येथील गुरूकुल च्या मान्यवर व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते यासही उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. धारूर येथे आर्य समाज, आर्य वैश्य समाज व आर्य वीर दल यांच्या संयुक्त विद्यमाने आठ दिवशीय योगासन व प्राणायाम शिबिराचे आयोजन नगरेश्वर मंदिर येथे करण्यात आले होते या शिबिरामध्ये योगागुरू आचार्य देववृत्तजी सरस्वती यांनी उपस्थित शिबिरार्थींना योगा व प्राणायाम याचे नियमित मार्गदर्शन केले या शिबिराच्या निमित्ताने गुरुकुल परळी येथील आचार्य सत्येंद्रजी पंडित प्रा वीरेंद्रजी शास्त्री यांच्या समवेत १५ गुरुकुल वाशी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत होम हवनाचेही आयोजन करण्यात आले होते यासाठीही शहरातील मोठ्या संख्येने उपस्थिती होती यावेळी ब्रह्मचारी योगेंद्र आर्य यांनी थायलंड मलेशिया सिंगापूर येथे विशेष सन्मान मिळवल्याने त्यांचा आचार्य देववृत्तजी सरस्वती यांच्या हस्ते गौरव करण्यात आला ब्रह्मचारी अनुदेव आर्य यांनीही कंठस्थ चार हजार स्तोत्राचे उच्चारण केले . त्यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला याप्रसंगी आचार्य देववृत्तजी सरस्वती यांचाही सन्मान योगा प्रशिक्षण दिल्याने करण्यात आला यावेळी डॉ धर्मपाल तोष्णीवाल आर्य समाजाचे प्रधान प्रमोदकुमारजी तिवारी मंत्री अँड प्रमोदकुमारजी मिश्रा प्रमोद गुंडेवार, सोमनाथआप्पा कांबळे, उद्धव खाडे, मनोहरप्रसाद तिवारी, गुळवे, शाम तोष्णीवाल आदीसह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते

# पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभाराविरोधात शेतकरीपुत्रांचा एल्गार

## पवनचक्की कंपन्यांना पाठीशी घालणाऱ्या प्रशासनाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रचंड निदर्शने

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बीड, पाटोदा व केज तालुक्यांमध्ये कार्यरत पवनचक्की कंपन्यांकडून गोरगरीब व अडाणी शेतकऱ्यांवर होत असलेली दहशतगिरी, आर्थिक लूट आणि मानसिक छळ असह्य झाल्याने अखेर शेतकरीपुत्र रस्त्यावर उतरले. पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभाराविरोधात तसेच त्यांना उघडपणे पाठीशी घालणाऱ्या जिल्हा प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात आज दि. १४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.







ही निदर्शने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ते महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. ''शेतकऱ्यांची लूट बंद करा'', ''पवनचक्की कंपन्यांची दादागिरी थांबवा'', ''शेतकऱ्यांच्या जमिनी परत द्या'', ''प्रशासन झोपले आहे का?'' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला.

यावेळी जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत केंद्रीय ऊर्जामंत्री राज्यमंत्री श्रीपाद नाईक, राज्यपाल, मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री बीड अजित पवार यांना निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, बाळासाहेब मोरे पाटील, राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, कुलदीप करपे, रामधन जमाले,सुहास जायभाये, गणेश नाईकवाडे, राजू गायके, बाजीराव ढाकणे, अमोल पाठक आदी शेतकरीपुत्र मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाचे भीषण वास्तव

डॉ. ढवळे यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत सांगितले की शेतकऱ्यांची कोणतीही लेखी परवानगी न घेता थेट शेतजमिनीत विद्युत पोल उभारले जात आहेत. शेतातून बळजबरीने विद्युत लाईन व रस्ते तयार केले जात आहेत. योग्य मोबदला न देता किंवा न वटणारे धनादेश देऊन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केली जात आहे. विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करून दडपशाही केली जात आहे, महसूल व पोलीस यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीर जमीन अधिग्रहण सुरू आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दि. २१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवनऊर्जा प्रकल्पांसाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्या स्थापन केल्या आहेत. जिल्हाधिकारी अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व पोलीस अधीक्षक सदस्य मात्र या समित्या केवळ कागदावरच अस्तित्वात असून शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

बीड तालुक्यातील महाजनवाडी, बोरखेड, कानडीघाट, गोलंग्री, चौसाळा, जाधववाडी, बेलगाव, खंडाळा, मुळूकवाडी, लिंबागणेश, वडवाडी तसेच पाटोदा तालुक्यातील धनगरजवळा, पाचेगाव, जवळाळा, बेडूकवाडी, वैद्यकिन्ही, दासखेड, बेनसूर, सोनेगाव येथील शेतकऱ्यांनी लेखी तक्रारी देऊनही एकही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचे आंदोलनात नमूद करण्यात आले.

### आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे

* दोषी पवनचक्की कंपन्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत * शेतजमिनीत बेकायदेशीर उभारलेले विद्युत पोल व रस्ते त्वरित काढून टाकावेत * शेतकऱ्यांना योग्य व न्याय्य मोबदला द्यावा * जबाबदार महसूल व पोलीस अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी डॉ. ढवळे यांनी स्पष्ट इशारा दिला की, ''शेतकऱ्यांवरील अन्याय तात्काळ थांबवला नाही, तर पुढील काळात जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.''

# बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीस २० वर्षे सक्तमजुरी ; न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील रामपुरी येथील सहा वर्षांच्या चिमुकलीवरील अमानुष लैंगिक अत्याचार प्रकरणात अखेर न्याय मिळाला असून, दोषी आरोपीस माननीय बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने २० वर्षे सक्तमजुरीचा कारावास व २१ हजार रुपयांचा दंड अशी कठोर शिक्षा सुनावली आहे. या निर्णयामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात समाधानाची भावना व्यक्त होत असून, बाललैंगिक अत्याचाराविरोधात न्यायालयाने कडक संदेश दिला आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की, दि. ४ मे २०२२ रोजी रामपुरी येथील सहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची अमानुष घटना घडली होती. या प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ६८/२०२२ भा.दं.वि. कलम ४५२, ३७६, ३४ तसेच लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम () २०१२ अंतर्गत कलम ४, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा सखोल तपास पिंक पथकाच्या महिला पोलीस उपनिरीक्षक अर्चना भोसले यांनी केला. तपासात सहाय्यक पोलीस फौजदार भगवान खाडे, पोलीस हवालदार महेश झिकरे व महिला पोलीस अंमलदार ज्योती साळुंखे यांनी मोलाचे सहकार्य केले. तपास पूर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र सत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. न्यायालयात सरकार पक्षाने सादर केलेले साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल व अन्य ठोस पुरावे ग्राह्य धरत, न्यायालयाने मुख्य आरोपी सुंदर निवृत्ती तायड (वय ३८, रा. रामपुरी, ता. गेवराई) यास दोषी ठरवले.

या खटल्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस अंमलदार अनुराधा गव्हाणे आणि अयोध्या खाडे यांनी कोर्ट पैरवी म्हणून प्रभावी भूमिका बजावली. फिर्यादीकडून भक्कम पुरावे मुद्देसूद मांडणी करत अॅड. भागवत राख सहाय्यक सहकारी अभियोक्ता व अॅड. तेजसजी सुभाष नेहरकर फिर्यादी चे वतीने यांनी कामकाज पाहिले. त्यांना सहाय्यक सरकारी अभियोक्ता अॅड. अजय राख, अॅड. अविनाश गंडले यांचे मार्गदर्शन लाभले. या निकालामुळे पीडित चिमुकलीला न्याय मिळाला असून, बाललैंगिक अत्याचार प्रकरणांत कोणतीही तडजोड होणार नाही, असा ठाम आणि कडक संदेश समाजात गेला आहे. या यशस्वी कामगिरीसाठी माननीय पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांचे मार्गदर्शन लाभले.


## पान ६ वरुन...


### स्वच्छता न झाल्यास रविवारी

यावर कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.या प्रकरणाने शहरातील व्यावसायिक आणि नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. स्वच्छता ही मूलभूत जबाबदारी असताना ती पार पडत नसल्याने व्यापाऱ्यांचा असंतोष वाढत आहे. नगरपरिषदेला आता ठोस पावले उचलावी लागणार आहेत.स्वच्छता करा, नसता रविवारी पालिकेसमोर बाजार भरविणार!बीड नगरपरिषद हद्दीतील व्यापाऱ्यांनी घाणीच्या तीव्र विरोधात इशारा दिला आहे. आठवडी बाजार, भाजी मंडईतील अस्वच्छतेमुळे रोगराईचा धोका वाढला असून, कर भरणाऱ्या व्यापाऱ्यांना त्रास होतोय. मोमीनपूरा, पालवन चौक, राजीवगांधी चौक आदी भाग स्वच्छ करा, अन्यथा रविवारी नगरपरिषद कार्यालयासमोर बाजार! भाजी विक्रेत्या व शेतकऱ्यांनी दिला

### मलकाचीवाडी येथे

सानप,माजी सभापती सुधाकर मिसाळ, हिवरसिंगा सरपंच दत्तात्रय शिंदे, माजी सरपंच चंद्रकांत सस्ते, चेअरमन अशोक साबळे, ग्रामसेवक सविता मिसाळ, तलाठी बाळासाहेब बांगर, शेतकरी बबनराव सानप, महादेव सानप आदीसह मलकाचीवाडी, वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट टिम पाटोदा शिरूर कासार, कैलास पन्हाळकर, अनिल पालवे, राजेंद्र जाधव, बाळु चेपटे, सोपान शिंदे, भरत कवठेकर, भागवत साबळे आदींची उपस्थिती होती.

### गोरक्षनाथ टेकडी येथे

ब्रह्मगिरी पर्वत प्रदक्षिणा करत असताना अनुग्रह दिला आणि निवृत्तीनाथ महाराजांनी हा अनुग्रह संत ज्ञानेश्वर महाराज यांना दिला या उपदेशातून वारकरी संप्रदायाची स्थापना झाली आणि ज्या भाविक भक्तांना त्रिंबकेश्वर नाशिक येथे ब्रह्मगिरीची पर्वत प्रदक्षिणा करण्याकरिता जाता येत नाही अशा भक्तांना गुरुवर्य किसन बाबांनी गोरक्षनाथ टेकडी येते गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा सुरू केली आहे

### राष्ट्रीय स्तरावरील 'बेस्ट अबॅकस

तसेच श्रीमती सोनिया कौर (प्राचार्य) मा डॉ अभिलाषा भुजबळ आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अबॅकस शिक्षणपद्धतीद्वारे विद्यार्थ्यांची गणितीय क्षमता, एकाग्रता, स्मरणशक्ती व गणनागती वाढवण्यासाठी सौ. अर्चना पवार गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मानसिक गणितात प्राविण्य मिळवत शालेय परीक्षांसह विविध तालुका, जिल्हा व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण प्रगती, आत्मविश्वासात झालेली वाढ तसेच गणिताविषयीची भीती दूर करण्यासाठी केलेले योगदान लक्षात घेऊन त्यांना हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल जिल्हा, तालुका व परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तसेच इन्स्पायर अबॅकस अकॅडमीच्या संचालिका अर्चना शेळके व दादासाहेब शेळके यांनीही सौ. अर्चना पवार यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

### विद्यापीठ नामविस्ताराचा

संघर्ष करावा लागला. हा संघर्ष दीर्घ काळापर्यंत चालला. जनतेची व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले व विद्यापीठाचा नामविस्तार झाला असे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस उपप्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व अभिवादनाने करण्यात आले. माननीय वक्त्यांचा परिचय व प्रास्ताविक संयोजक डॉ. राहुल साळवे यांनी केले. उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, प्रा. विनायक कापावार, डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकिय कर्मचारी, विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी तर आभार डॉ. बालाजी नवले यांनी मानले.

# युसूफवडगांव विद्यालयाचे नॅशनल सायन्स ओलंपियाड स्पर्धा परीक्षेत नेत्रदीपक यश

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युसूफवडगांव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय युसूफवडगांव मधील विद्यार्थ्यांनी सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या नॅशनल सायन्स ओलंपियाड स्पर्धा परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश मिळवले आहे.



यामध्ये अकरावी विज्ञान वर्गातून प्रथम चि. पाटील वेदांत लिंबराज, (९७.९५%) चि. निकम अभिषेक श्रीराम, (९७.९५%)तर द्वितीय चि. राऊत अथर्व सुरेश,(९७.९२%) तर तृतीय चि. कुलकर्णी अर्णव उमाकांत, (९७.५९%)चि. मोरे अभिजीत दादा, ( ९७.५९%)चि. पठाण इरफान हज्जू,(९७.५९%) तसेच बारावी विज्ञान वर्गातून प्रथम कु. शिंदे दिशा गोविंद(९७.२३%), द्वितीय कु. जाधव ज्ञानेश्वरी पांडुरंग,(९७.२१%) तृतीय कु. यादव प्रतीक्षा रामचंद्र(९६.७९%) तर इयत्ता दहावी वर्गातून प्रथम चि सावंत श्रीराम रमेश( ९७.९२%) यांनी क्रमांक पटकावले असून या सर्व विद्यार्थ्यांना लेवल फर्स्ट साठी गोल्ड मेडल व अप्रिसिएशन प्रमाणपत्र मिळणार असून,यासोबतच वरील सर्व विद्यार्थी आणि अकरावी विज्ञान मधील चि. राऊत राहुल सुग्रीव (९६.७४%)व चि.मस्के सुजित चंद्रकांत(९७.१९%) यांच्यासह एकूण अकरा विद्यार्थी नॅशनल सायन्स ओलंपियाड स्पर्धा परीक्षा लेव्हल.-२ साठी( जिल्हास्तरीय) कॉलिफिकेशन झाले आहे.असे नॅशनल सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत कळविण्यात आले आहे यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था सचिव दीपक दादा घुमरे,संस्था अध्यक्ष श्री सुकाळे यु.बी,प्राचार्य श्री भोसले ए.यु,उच्च माध्यमिक विभाग प्रमुख श्री.चव्हाण एन.एन,श्री प्रदीप घुमरे,शिक्षक प्राध्यापक,असंख्य पालकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# रुई पिंपळा ग्रामपंचायत ठरली आदर्श मॉडेल सरपंच मयुर आंधळे यांचे राज्यभरातून कौतुक

वडवणी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान २०२५-२६ या कार्यक्रमात वडवणी तालुक्यातील रुई पिंपळा गावाने दि.३० डिसेंबर रोजी सक्रिय सहभाग घेतला होता. ग्राम स्थांनी देखील लक्षणीय उपस्थिती दर्शवून कार्यक्रम यशस्वी पार पाडला. या कार्यक्रमात येथील उच्चशिक्षित तसेच कर्तव्यदक्ष युबा सरपंच मयुर भैय्या आंधळे यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायतीने विविध जन कल्याणकारी उपक्रम राबवले होते. या अभियानात महाराष्ट्र शासनासाठी रुई पिंपळा ग्राम पंचायत एक आदर्श मॉडल म्हणून पुढे आली असून शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या वेबपोर्टलवर रुई ग्रामपंचायतीच्या या उपक्रमांची दखल घेवून उपक्रमांची छायाचित्रे संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी म्हणून प्रसिध्द करण्यात आली आहेत. दरम्यान गावातील विकासात्मक कार्यप्रणालीसाठी सरपंच मयुर भैय्या आंधळे यांनी घेतलेले कष्ट हे जनहिताचे ठरल्याने त्यांचे राज्यभर कौतुक होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्याला सुजलाम्? सुफलाम्? करणाऱ्या उर्ध्व १०० मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कुंडलिका प्रकल्पाच्या उभारणीनंतर बडवणी तालुक्यातील एकमेव पूनर्वसीत गांव म्हणून मौजे रुई पिंपळा या गावची ओळख आहे. येथील उच्चशिक्षित युवा कार्यतत्पर सरपंच मयुर भैय्या आंधळे यांच्याकडे गावचा कारभार आहे. विकासाची कामे, त्यांचा दर्जा तसेच लोकसहभाग महत्त्वाचा करुन ते जनहिताचे ठरावे. या माध्यम ातून या गावचा विकासात्मक कायापालट होतांना दिसून येत आहे. तर दि.३० डिसेंबर २०२५ रोजी शासनाच्या मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत कार्यक्रमात रुई पिंपळा या गावाने देखील सक्रिय सहभाग नोंदवला होता. या माध्यमातून महिला अमेनिया तपासणी व जनजागृती शिबीर, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबीर, प्लास्टिक मुक्त गावासाठी मोफत कापडी पिशवी वाटप तसेच गाव स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनातून समृध्द गाव घडविण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल उचलले होते. हा कार्यक्रम अगदी लोकसहभागातून घेण्यात आला होता. या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन आणि नियोजन युवा कार्यतत्पर सरपंच मयुर भैय्या आंधळे यांच्या पुढाकारातून व त्यांच्या माध्यमातून उत्कृष्ट आणि देखणे झाले होते. हा कार्यक्रम देखील यशस्वी पार पाडला.

# पुस्तकाचा गंध मस्तकात रुजला की माणूस घडतो -प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त तुलसी महाविद्यालयात व्याख्यान

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला लाभल्यानंतर या विद्यापीठाचा दर्जा ज्ञानाने समृद्ध करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. ज्ञानाची श्रीमंती वाढली, पुस्तकाचा गंध मस्तकात रुजला की माणूस घडतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त बुधवार (दि. १४) रोजी तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. हा कार्यक्रम तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशन, बीडचे अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रियदर्शी बहुजनवादी स्पर्धा परीक्षा केंद्राचे अध्यक्ष प्रा.अशोक गायकवाड तसेच जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त मा.उमेश सोनवणे उपस्थित होते.



डॉ. लुलेकर यांनी मराठवाड्याचा ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक प्रवास उलगडून सांगताना नमूद केले की, मराठवाडा हा दीर्घकाळ गुलामीत राहिलेला प्रदेश असून निजामशाहीच्या काळात शिक्षणाची मोठी पीछेहाट झाली. १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतरच या भागात उच्च शिक्षणाची खरी सुरुवात झाली.फुलेशाहूआंबेडकर आणि शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आजही जातीवादातून मुक्त नसल्यामुळे विद्यापीठाच्या नामांतराला सतरा वर्षे विरोध झाला. अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी नामांतर झाले. बाबासाहेबांचे नाव मिळाल्यानंतर विद्यापीठाचा दर्जा उंचावण्याची जबाबदारी शिक्षक, विद्यार्थी आणि समाजावर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठातील अनेक विभागांमध्ये विद्यार्थी प्रवेश कमी होत असल्याबाबत चिंता व्यक्त करताना डॉ. लुलेकर म्हणाले की, शिक्षणाशिवाय समाजाच्या प्रगतीला कोणताही पर्याय नाही. केवळ पदव्या नव्हे तर मुळातून ज्ञानसमृद्ध व्हावे लागते. समाजाने आपली मुले महाविद्यालये व विद्यापीठांत शिक्षणासाठी पाठवावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख पाहुणे उमेश सोनवणे यांनी शेक्सपियरच्या उदाहरणातून सांगितले की, गुलाबाला कोणतेही नाव दिले तरी त्याचा सुगंध कमी होत नाही. विद्यापीठाचा नामविस्तार हा केवळ नावाचा प्रश्न नसून तो आत्मसन्मान व स्वाभिमानाची लढाई असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी सांगितले की, ज्ञान हे आयुष्यभर उपयोगी पडते. ते मिळवण्यासाठी वाचन आवश्यक आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी वाचन केले, तर त्यांना वेगळे सांगावे लागणार नाही. ज्ञानाची आवड निर्माण व्हावी, यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, असे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विकास वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमास संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**घनसावंगी नगरपंचायत, घनसावंगी**

**प्रशासकिय इमारत, घनसावंगी जि. जालना**

e-mail-npghansawangi@gmail.com ०२४८२ २७१७८७

जा.क्र./घनपं/स्थापत्य वि-०२/२६२३ दि.१४/०१/२०२६

**बांधकाम विभाग**

ई-निविदा सुचना क्रमांक-०६- सन २०२५-२६ (पहिली वेळ)

घनसावंगी नगर पंचायतीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) व नागरी वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत खालील प्रमाणे सार्वजनिक बांधकामे हाती घेणे करीता ई-निविदा बी-१ फॉर्म मध्ये अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

ई-निविदा बाबतचा सविस्तर तपशील http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.२२/०१/२०२६ रोजीपर्यंत उपलब्ध आहे.

कोणतेही निविदा मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार नगरपंचायतने राखून ठेवलेला आहे.

निविदे सौथत कोणतीही मार्गदर्शक सुधना, शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहवायास मिळेल.

सदर ई-निविदा शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन दाखल करता येईल.

स्वाक्षरित/-

मुख्याधिकारी

घनसावंगी नगर पंचायत

# शेतीत मीठ टाकणे फायदेशीर की घातक?


शेतीमध्ये पिकांच्या वाढीसाठी वेगवेगळ्या प्रकारचे खते, सेंद्रिय पदार्थ आणि विविध उपाय वापरले जातात. अलीकडे अनेक शेतकऱ्यांमध्ये एक प्रश्न कायम चर्चेत असतो, तो म्हणजे पिकांसाठी मीठ वापरणे योग्य आहे का? काही ठिकाणी तण नियंत्रणासाठी किंवा दुष्काळी परिस्थितीत जमिनीत आर्द्रता टिकवण्यासाठी मिठाचा वापर केला जातो. मात्र, याचे फायदे जितके आहेत, तितकेच तोटेही आहेत. त्यामुळे मिठाचा वापर करताना योग्य माहिती आणि काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.



मीठ वापरण्याबाबत तज्ञांचे मत : मीठ म्हणजे सोडीयम क्लोराईड. हा पदार्थ आपण रोजच्या जेवणात वापरतो, पण शेतीत त्याचा वापर फार मर्यादित आणि योग्य पद्धतीनेच करावा लागतो. तज्ज्ञांच्या मते, मीठ हे वनस्पतींसाठी आवश्यक अन्नद्रव्य नाही. म्हणजेच पिकांच्या वाढीसाठी ते अनिवार्य नाही. मात्र काही विशिष्ट परिस्थितीत आणि काही ठराविक पिकांमध्ये ते उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे मीठाला ''उपयुक्त'' किंवा ''लाभदायक'' अन्नद्रव्य असे म्हटले जाते. ज्या जमिनीत पोटॅशियमचे प्रमाण खूप कमी असते, अशा ठिकाणी अतिशय कमी प्रमाणात मिठाचा वापर करता येतो. अशा वेळी सोडीयम काही अंशी पोटॅशियमचे काम करतो. मात्र हे प्रमाण फारच कमी असणे आवश्यक आहे. साधारणपणे ०.०५८ ग्रॅम मीठ प्रति लिटर पाण्यात मिसळूनच वापर करावा, असे तज्ज्ञ सुचवतात. यापेक्षा जास्त प्रमाण वापरल्यास जमिनीची रचना बिघडू शकते आणि पिकांचे मोठे नुकसान होऊ शकते.

या पिकांसाठी करा मिठाचा वापर : मीठाचा वापर सर्व पिकांसाठी योग्य नसतो. फक्त काही क्षार सहनशील किंवा क्षार प्रिय पिकांमध्येच तो मर्यादित प्रमाणात करता येतो. उदाहरणार्थ, शुगर बीट, गाजर, नारळ, कोको, ऑलिव्ह, निलगिरी, शतावरी, ब्रोकोली आणि पालक यांसारखी पिके मिठाला काही प्रमाणात सहन करू शकतात. तसेच ज्वारी, बाजरी आणि इतर मिलेट पिकांमध्येही सोडीयमची थोडी गरज असते. या पिकांमध्ये सोडीयम कार्बन डायऑक्साइडचे शोषण आणि अन्ननिर्मितीच्या प्रक्रियेत मदत करतो.काही शेतकरी तणनाशक म्हणून मिठाचा वापर करतात. खरं तर मीठ तण नष्ट करू शकते, पण त्याच वेळी ते जमिनीलाही खराब करते. जास्त मीठ जमिनीत गेल्यास जमिनीत क्षार साचतात, पाणी मुरत नाही आणि भविष्यात कोणतेही पीक घेणे कठीण होते. त्यामुळे तण नियंत्रणासाठी मिठाचा वापर करणे टाळावे, असे कृषी तज्ज्ञ स्पष्ट सांगतात. दुष्काळी परिस्थितीत जमिनीत ओलावा टिकवण्यासाठीही काही ठिकाणी मिठाचा वापर केला जातो. मात्र हा उपाय तात्पुरता असतो आणि दीर्घकाळात तो जमिनीसाठी घातक ठरू शकतो. म्हणून अशा वेळी सेंद्रिय खत, आच्छादन किंवा पाणी व्यवस्थापनाचे उपाय अधिक सुरक्षित मानले जातात.अशाप्रकारे मिठाचा वापर शेतीत अत्यंत मर्यादित, योग्य पिकांमध्ये आणि योग्य प्रमाणातच करावा. कोणताही प्रयोग करण्यापूर्वी माती परीक्षण करून कृषी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. चुकीच्या प्रमाणात मिठाचा वापर केल्यास उत्पादन घटू शकते आणि जमिनीची सुपीकता कायमची कमी होऊ शकते. त्यामुळे ''फायदा होईल'' या गैरसमजामुळे मिठाचा वापर न करता शास्त्रीय मार्गदर्शनानुसारच निर्णय घेणे शेतकऱ्यांसाठी अधिक फायदेशीर ठरेल.

# स्वच्छ दूध उत्पादनासाठी सोप्या टिप्स



दुधामध्ये पाणी, कर्बोदके, स्निग्धांश, क्षार, जीवनसत्वे व भरपूर प्रमाणात कॅलरीज असल्याने दूध हे पूर्णान्न आहे. या पूर्णांन्न असलेल्या दुधाची काळजी घेतली तर स्वच्छ दूध मिळते. त्यासाठी काय करावे, कोणते उपाय योजावेत याची माहिती असल्यास तसे नियोजन करण्यास सोपे जाते.

स्वच्छ दूध उत्पादनासाठी काळजी : यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जनावरांचा गोठा आणि दूध काढण्याची जागा शक्यतो वेगवेगळे असावे. दूध काढण्यासाठी स्वच्छ मोकळी जागा वापरली तरी चालण्यासारखे आहे. ज्या ठिकाणी आपण दूध काढतो त्या ठिकाणचा परिसर व आसपासचा परिसर स्वच्छ ठेवावा. दुभते जनावर वेगळे करून त्याच्या कमरेचा भाग, शक्ती व मागील मांड्या यावरून पाणी मारून खरारा करावा व कास आणि सड खरबरीत स्वच्छ फडक्याने पुसून स्वच्छ करावे यामुळे रक्ताभिसरण वाढून जनावर ताजीतवाने आणि तरतरीत होते. जनावराला बांधल्यानंतर कोमट पाण्यात अगदी कमी प्रमाणात पोटॅशियम परमॅग्नेट चे खडे टाकून तयार केलेल्या सौम्य द्रावणाने त्याची कास व सड धुवावे व लगेच स्वच्छ फडक्याने पुसावे. दरम्यान दूध काढण्यासाठी स्वच्छ व निर्जंतुक केलेली भांडी, एक छोटा कप दूध गाळण्याचे स्वच्छ मलमल पांढरे कापड जागेवर आणून ठेवावे. कोमट पाण्याने कास धुतल्यानंतर गाय किंवा म्हैस पान्हा सोडण्यास सुरुवात करते. दूध काढणाऱ्या व्यक्तीने आपले हात पोटॅशियम परमॅग्नेट च्या द्रावणात धुऊन स्वच्छ करावेत व दूध काढण्यास सुरुवात करावी. सर्वप्रथम प्रत्येक सडातील पहिल्या काही धारा वेगवेगळ्या स्वतंत्र कपात काढावेत व स्तनदाह याची चाचणी करावी. दूध काढण्याची क्रिया सुमारे सात ते आठ मिनिटांत पूर्ण करावी व दूध मुठ पद्धतीने काढावे. दूध काढण्यासाठी डोन शेप म्हणजेच विशिष्ट आकार असणारी भांडे वापरावीत. दूध काढणी संपल्यानंतर दुधाचे भांडे वेगळ्या खोलीत न्यावे. दूध काढताना जनावरास शक्यतो वाळलेली वैरण, घास इत्यादी प्रकारचे खाद्य घालू नये फक्त आंबवून द्यावे. दुध स्वच्छ व कोरड्या शक्यतो स्टीलच्या भांड्यात मलमलच्या पांढरा फडक्यातून गाळून साठवावे. शक्य असेल तर काढलेल्या दुधाचे भांडे बर्फाच्या पाण्यात लगेच बुडून ठेवावे. हे शक्य नसेल तरी आपल्या जगभरातील माठातील किंवा रांजण तील गार पाणी वापरावे. थोड्या थोड्या वेळाने पाणी बदलावे. गाळून थंड पाण्यात साठवलेल्या दूधाचा लवकरात लवकर वापर किंवा विक्री करावी. अशा पद्धतीने दूध उत्पादन केल्या दुधाची प्रत व गुणवत्तेत सुधारणा होऊन त्याची साठवण क्षमता निश्चित वाढते.

# असे करा बॉयलर कोंबड्यांचे खाद्य व्यवस्थापन

पोल्ट्री फार्म व्यवसायात खाद्य व्यवस्थापनाला फार महत्त्व आहे. कोंबड्यांच्या वाढीसाठी पोषक आहार गरजेचा असतो. अशा वेळी त्यांना पिल्लांच्या अवस्थेत आणि मोठे झाल्यावर ही खाद्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन आवश्यक असते. खाद्य चांगले साठवणे आणि वेळ देणे असे दोन्ही घटक यामध्ये येतात. त्यासाठी पोल्ट्री शेडमध्ये विशेष लक्ष पुरवणे गरजेचे असते.




पोल्ट्री शेड मध्ये खाद्य व्यवस्थापन : शेडमध्ये वेगळ्या खोलीत खाद्याच्या पोत्यांची व औषधांची साठवण करावी.

खाद्याची गुणवत्ता खराब होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी. भिंतीपासून एक फूट लांब आणि जमिनीच्या वर एक फूट उंचीवर लाकडी फळ्यांची रॅक बनवून त्यावर ५,५ त्या लॉटमध्ये पोते ठेवावेत. खाद्य ठेवण्याची जागा कोरडी असावी तसेच जास्त प्रमाणात खाद्य एकत्र ठेवल्यास उष्णता वाढून खाद्याची प्रतवारी खराब होते. ज्या ठिकाणी आपण खाद्य ठेवलेले आहेत याठिकाणी उंदीर होणार नाहीत याची काळजी घ्यावी. कारण उंदीर हे खाद्याची नासाडी करतात. खाद्याचा अपव्यय टाळण्यासाठी पन्नास पिल्लांसाठी एक फिडर असेल त्याप्रमाणे नियोजन करणे महत्त्वाचे असते. तसेच फिटर जवळ पिल्लांची गर्दी होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी. खाद्याची भांडी प्रत्येक आठवड्याला स्वच्छ आणि साफ करून घ्यावीत. खाली असलेल्या तूसावर खाद्य पडणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी तसेच सांडलेले खाद्य आणि त्यासह जर तूस पक्षांनी खाल्ल्यास त्यामुळे आजार वाढतात. खाद्य पाणी देण्यासाठीही पिल्ले व मोठ्या कोंबड्या यांच्यासाठी प्रत्येकी ५० साठी एक ड्रिंकर असणे महत्वाचे आहे. खाद्य हे पिल्ले व कोंबड्यांच्या वाढीसाठी खूप महत्त्वाचे असून या मुद्द्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. आपण शेडमध्ये खाली भुईमुगाच्या शेंगांची टरफले किंवा गव्हाची साळ म्हणजेच तूस पसरवतो कारण पिल्लांच्या पायांना इजा होऊ नये हे त्या मागचे कारण असते. खाली अंथरलेल्या तूसची व्यवस्थित काळजी न घेतल्यास किल्ले व कोंबड्यांना काही आजार होऊन वजनाची योग्य प्रमाणात वाढ होण्यास सह मरतूख वाढते. शेडमध्ये खाली पसरवण्यासाठी आणलेली टरफले किंवा तूस धूळ बसलेली अजिबात असू नये. कारण धुळयुक्त तूसा मुळे पक्ष्यांना श्वसन दाह होऊ शकतो. प्रति एक हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या शेडमध्ये चारशे किलो तूर वापरावे. उन्हाळ्यात तुसाचा थर हिवाळ्याच्या तुलनेत कमी असावा. हिवाळ्यात चार इंच तर उन्हाळ्यात दोन इंचाचा थर टाकावा. तुसामधील आद्रता २० टक्क्यांपेक्षा जास्त वाढल्यास पिलांना जिवाणू व विषाणूजन्य आजारांची लागण होऊ शकते. अशावेळी मग तूस तातडीने बदलावे. तसा मध्ये अमोनिया या वायूचे प्रमाण वाढण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे पक्षी आजारी पडून वजन वाढ रोखली जाते. हे टाळण्यासाठी एक हजार चौरस फुटांवर गरजेनुसार दहा ते २० किलो सुपर फॉस्पेट फवारावे.

# शेतातील पिकांच्या योग्य वाढीसाठी स्फुरदची आवश्यकता

शेतीमध्ये पिकांची चांगली वाढ होण्यासाठी अन्नद्रव्यांचा समतोल खूप महत्त्वाचा असतो. नत्र, स्फुरद आणि पालाश ही तीन मुख्य अन्नद्रव्ये मानली जातात. यापैकी स्फुरद म्हणजेच फॉस्फरस हे अन्नद्रव्य पिकांसाठी अत्यंत आवश्यक आहे. मात्र अनेक वेळा शेतकऱ्यांच्या पिकांमध्ये स्फुरदची कमतरता दिसून येते. कारण स्फुरद हे अन्नद्रव्य मातीमध्ये सहज विरघळत नाही आणि मातीमध्ये एकाच ठिकाणी स्थिर राहते. त्यामुळे पिकांच्या मुळांना ते पुरेशा प्रमाणात मिळत नाही. स्फुरद अन्नद्रव्य पिकांच्या मुळांची वाढ, फुलधारणा, फळधारणा आणि दाणे भरण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. जर पिकाला स्फुरद योग्य प्रमाणात मिळाले नाही, तर त्याचा थेट परिणाम पिकाच्या वाढीवर आणि उत्पादनावर होतो. त्यामुळे स्फुरदची कमतरता ओळखणे आणि वेळेवर उपाय करणे शेतकऱ्यांसाठी खूप गरजेचे आहे.



स्फुरदची कमतरता असेल तर दिसणारे लक्षणे : स्फुरदची कमतरता असलेल्या पिकांमध्ये काही ठराविक लक्षणे दिसून येतात. सर्वात पहिले लक्षण म्हणजे रोपांची वाढ खुंटते. पिकाची उंची अपेक्षेपेक्षा कमी राहते आणि झाडे कमजोर दिसू लागतात. पिकांची पाने सुरुवातीला गडद हिरवी दिसतात. काही काळानंतर या पानांवर जांभळी, तांबूस किंवा निळसर छटा दिसू लागते. विशेषतः जुनी पाने अशा प्रकारे रंग बदलतात.स्फुरदची कमतरता वाढत गेल्यास पानांच्या कडा वाळू लागतात आणि पानांची संख्या देखील कमी होते. फुलधारणा उशिरा होते, त्यामुळे फळे किंवा शेंगा वेळेवर लागत नाहीत. फळे, शेंगा किंवा धान्याचा आकार लहान राहतो. धान्य पिकांमध्ये दाणे नीट भरत नाहीत आणि उत्पादनात घट होते. ही सर्व लक्षणे दिसत असल्यास पिकांमध्ये स्फुरदची कमतरता असल्याची शक्यता असते.

स्फुरदची कमतरता भरून काढण्यासाठी उपाय : स्फुरदची कमतरता भरून काढण्यासाठी योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय म्हणजे स्फुरदयुक्त खतांचा वापर करणे. यामध्ये सिंगल सुपर फॉस्फेट (एसएसपी) आणि डाय अमोनियम फॉस्फेट (डीएपी) यांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. ही खते पेरणीच्या वेळी किंवा पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत दिल्यास चांगला फायदा होतो.रासायनिक खतांसोबत सेंद्रिय खतांचा वापर केल्यास स्फुरदची उपलब्धता अधिक चांगली होते. शेणखत, कंपोस्ट खत आणि गांडूळ खत यांचा नियमित वापर केल्याने मातीची रचना सुधारते आणि स्फुरद हळूहळू पिकांना उपलब्ध होतो. तसेच फॉस्फेट सोलीबल बॅक्टेरिया म्हणजेच पीएसबी या जिवाणूंचा वापर केल्यास मातीतील अघुलनशील स्फुरद विरघळून पिकांना मिळतो. मायकोरायझा या उपयुक्त जिवाणूंचा वापर केल्यास पिकांच्या मुळांची कार्यक्षमता वाढते आणि स्फुरदचे शोषण अधिक चांगल्या प्रकारे होते. यासोबतच मातीचा सामू म्हणजेच पीएच संतुलित ठेवणे फार महत्त्वाचे आहे. साधारणपणे ७.०० ते ८.०० या मर्यादेत सामू असल्यास स्फुरद पिकांना चांगल्या प्रकारे उपलब्ध होतो. जमिनीची क्षारता १.०० पेक्षा कमी ठेवणेही गरजेचे आहे.योग्य खत व्यवस्थापन, सेंद्रिय घटकांचा वापर आणि मातीची निगा राखल्यास स्फुरदची कमतरता दूर करता येते. अशा पद्धतीने स्फुरदचे योग्य व्यवस्थापन केल्यास पिकांची वाढ जोमदार होते, फुलधारणा आणि फळधारणा सुधारते आणि शेवटी उत्पादनातही लक्षणीय वाढ होते.




## जागतिक दिवस: राष्ट्रीय सैन्य दिवस

### महत्वाच्या घटना

१५५९ : राणी एलिझाबेथ (पहिली) हिचा इंग्लंडची राणी म्हणून वेस्टमिन्स्टर ॲबे येथे राज्याभिषेक झाला.
१७६१ : पानिपतचे तिसरे युद्ध संपले.
१८६१ : एलिशा जी. ओटिस या संशोधकाला सुरक्षित उद्वाहकाचे जगातील पहिले पेटंट मिळाले.
१८८९ : द पेंबरटन मेडिसिन कंपनी या कंपनीची अटलांटा, जॉर्जिया, यू. एस. ए. येथे स्थापना झाली. ही कंपनी सध्या द कोका कोला कंपनी म्हणून प्रसिद्ध आहे.
१९४९ : जनरल करिअप्पा यांनी ब्रिटिशांकडुन भारतीय सेनेची सूत्रे हाती घेतली.
१९७० : मुअम्मर गडाफी लीबीयाचे सर्वेसर्वा झाले.
१९७३ : जनरल गोपाळ गुरुनाथ बेवूर यांनी भारताचे ९ वे लष्करप्रमुख म्हणून सूत्रे हाती घेतली. हे लष्करप्रमुख होणारे पहिले महाराष्ट्रीयन आहेत.
१९९६ : भारतातील रेल्वेयुगाच्या प्रारंभापासून ब्रिटिश परंपरा व संस्कृतीचा डौल मिरवणाऱ्या बोरीबंदर (व्हिक्टोरिया टर्मिनस) या स्थानकाचे नाव बदलुन ते छत्रपती शिवाजी टर्मिनस असे करण्यात आले.
१९९९ : गायिका ज्योत्स्ना भोळे यांना राज्य सरकारच्या वतीने गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२००१ : सर्वांना मोफत असलेला ज्ञानकोश 'विकीपिडिया' हा इंटरनेटवर प्रथमच उपलब्ध झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७९ : रॉबर्ट ग्रँट मुंबई इलाख्याचे राज्यपाल, मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेजचे एक संस्थापक, मुंबईतील ग्रँट रोड हा त्यांच्याच नावाने ओळखला जातो. (मृत्यू:१८३८)
१८५६ : भारताचे प्रसिध्द राजनीती मर्मज्ञ, सामाजिक कार्यकर्ते अश्विनी कुमार दत्त यांचा जन्म.
१९१८ : भारताचे प्रसिद्ध स्वातंत्र्य सैनिक यशवंत अग्रवाडेकर यांचा जन्म.
१९२० : डॉ. आर. सी. हिरेमठ कन्नड साहित्यिक, कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: ३ नोव्हेंबर १९९८)
१९२१ : बाबासाहेब भोसले महाराष्ट्राचे ९ वे मुख्यमंत्री कार्यकाल: २१ जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३ (मृत्यू: ६ आक्टोबर २००७)
१९२६ : कुस्तीगीर खाशाबा दादासाहेब जाधव १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमधे वैयक्तिक पदक मिळवणारे पहिले भारतीय, शिवछत्रपती पुरस्कार मरणोत्तर (मृत्यू: १४ ऑगस्ट १९८४)
१९२९ : मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) कृष्णवर्णीयांचे गांधी म्हणून ओळखले जाणारे अमेरिकेतील मानवी हक्क कार्यकर्ते आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ४ एप्रिल १९६८)
१९३१ : मराठीह कथाकार शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांचा जन्म.
१९३८ : भारतीय फुटबॉलर चुनी गोस्वामी यांचा जन्म.
१९४७ : पत्रकार नितीश नंदी यांचा जन्म.
१९५६ : बहुजन समाज पक्षाच्या नेत्या मायावती यांचा जन्म.
१९८२ : प्रसिद्ध अभिनेता नील नितीन मुकेश यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९७१ : दीनानाथ दलाल अत्यंत लोकप्रिय व प्रतिभावान चित्रकार (जन्म: ३० मे १९१६)
१९९४ : हरिलाल उपाध्याय गुजराथी लेखक, कवी व ज्योतिषी (जन्म: २२ जानेवारी १९१६)
१९९८ : गुलजारीलाल नंदा भारताचे दुसरे पंतप्रधान, स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी कार्यकर्ते (जन्म: ४ जुलै १८९८)
२००२ : विठाबाई भाऊ (मांग) नारायणगावकर राष्ट्रपतिपदक विजेत्या तमाशा कलावंत (जन्म: ? ? १९३५)
२००९ : दादासाहेब फाळके पुरस्कार जिंकणारे तपन सिन्हा यांचे निधन.
२०१२ : भारताच्या पहिल्या महिला फोटोग्राफर होमाई व्यारावाला यांचे निधन.
२०१३ : डॉ. शरदचंद्र गोखले समाजसेवक (जन्म: २९ सप्टेंबर १९२५)
२०१४ : नामदेव लक्ष्मण ढसाळ दलित साहित्यिक (जन्म: १५ फेब्रुवारी १९४९)

# वाढत्या थंडीत कांदा, गहू, हरभरा पिकांचे व्यवस्थापन

वाढती थंडी, धुके व ढगाळ वातावरणामुळे रब्बी हंगामातील कांदा, गहू व हरभरा या पिकांवर विविध कीड व रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता दिसून येत आहे. सोबत अति थंडीमुळे वाढ सुद्धा खुंटलेली दिसत आहे. यासाठी शेतकरी बांधवानी उपाय योजना कराण्याची गरज आहे. कांदा पिकासाठी : थंडीत पडणाऱ्या दवामळे करपा रोग मोठ्या प्रमाणावर वाढतो. नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा व्हिरीडी / हारझियानम जैविक बुरशीनाशक १० ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. मातीमध्ये २.५ किलो/एकर ट्रायकोडर्मा शेणखतात मिसळून द्यावे. करपा रोगाचा अधिक प्रादुर्भाव दिसताच डायफेनोकोनाझोल २५% १ मि.ली. लिटर किंवा ॲझोक्सीस्ट्रोबीन टेबुकोनाझोल १ ग्रॅम/लिटर प्रमाण घेऊन ८ ते १० दिवसाच्या अंतराने आलटून पालटून फवारणी करावी. फुल किडीच्या नियंत्रणासाठी नीम तेल १०००० पीपीएम १ मि.ली. लिटर किंवा फिप्रोनील ५% १ मि.ली. / लिटर प्रमाण घेऊन फवारणी करावी. गहू पिकासाठी : मावा किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८% ०.३ मि.ली./लिटर किंवा थायमेथॉक्साम २५% ०.२५ ग्रॅम/लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. हरभरा पिकासाठी : फुले येण्याची अवस्था असताना ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडीरेक्टीन ३०० पीपीएम ५० मिली / लिटर व घाटे लागताना इमामेक्टिन बेंझोएट ५ % ०.४ ग्रॅम /लिटर पाणी किंवा इंडॉक्साकार्ब १४.५% १ मि.ली. / लिटर किंवा क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल १८.५% ०.३ मि.ली. / लिटर किंवा स्पायनोसॅड ४५% ०.३ मि.ली. / लिटर प्रमाण घेऊन एका कीड नाशकाची फवारणी करावी सर्व पिकांसाठी : दव असताना फवारणी टाळा; दुपारी ११ ते ४ या वेळेत करा. हलके पण वारंवार पाणी टाळा यामुळे बुरशीजन्य रोगाचे प्रमाण वाढते वाफसा आल्यावरच पाणी द्यावे. अतिरिक्त नत्राचा वापर टाळावा यामुळे मावा/फुलकिड व बुरशीजन्य रोग वाढतात व सोबत पालाश पुरेसा द्यावा.

cmyk




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

गुरूवार दि.१५ जानेवारी २०२६ ५




# महानगरपालिकासाठी आज जालन्यात मतदान
# मतदान केंद्रावर अधिकारी कर्मचारी सज्ज
## मतदान केंद्रसाठी २९१ केंद्रअध्यक्ष .८७३कर्मचारी.२९१ शिपाई

जालना। प्रतिनिधी

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जालना शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी आज१५ जानेवारी रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत मतदान होणार आहे. ही मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी जालना शहर महानगरपालिका २९१ मतदान अधिकाऱ्यांची पथके जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत आज बुधवार, दि.१४ जानेवारी रोजी संबंधीत मतदान केंद्राकडे रवाना झाली असून, जालना शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी सर्व मतदान केंद्रे सज्ज झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी दिली. जालना शहर महानगरपालिकेसाठी दि.१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होत असून, या मतदान प्रक्रियेसाठी महापालिका निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रांवर चोख पोलिस बंदोबस्त राहणार आहे. जालना शहर महानगरपालिका निवडणूकीसाठी २९१ मतदान



केंद्रे आहेत. या ठिकाणी क्षेत्रीय अधिकारी, मतदान पथकांची नियुक्ती करण्यात आली असून, ही पथके देखील आज मतदान केंद्रावर रवाना झाली आहेत. मतदान पथकांसोबत ईव्हीएम यंत्रासह साहित्य, प्रथोमोपचार वैद्यकीय किट, ओआरएस आदी औषधी देण्यात आली आहेत.

जालना शहर महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया शांतता आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी २९१ मतदान केंद्रावर पोलीस कर्मचाऱ्यासह २९१ केंद्राध्यक्ष, ८७३ मतदान अधिकारी-कर्मचारी शिपाई २९१ यांची नेमणुक करण्यात आली आहे. तसेच २९१ केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेर्यांची नजर असणार आहे. दिव्यांग आणि जेष्ठ नागरिकांना मतदानासाठी सोय करण्यात आली असून १०६ इमारतीत एकूण २९१ मतदान केंद्रांवर व्हील चेअरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदान संपल्यानंतर सर्व मतदान पथके सायंकाळी जालना औद्योगिक वसाहतीमधील सिद्धिकी इंजिनियरिंग या ठिकाणी ईव्हीएम मशीन व इतर साहित्य जमा करतील तर स्ट्रॉगरुममध्ये मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनियार, जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल, उमेदवार, प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत सर्व मतदान यंत्र सिलबंद केली जातील अशी माहिती जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी दिली आहे. मतदारांनी आपली लोकशाही सक्षम करण्यासाठी मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस म्हणून साजरा न करता लोकशाहीचा उत्सव म्हणून साजरा करणे आवश्यक आहे. नव मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून, लोकशाहीच्या बळकटीकरणात सहभागी व्हावे तसेच इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करावे. जालना शहरातील नागरिकांनी निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांनी केली मतदान केंद्रांची पाहणी



जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेसाठी दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी जालना शहरातील २९१ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जालना शहर महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी आज दि. १३ जानेवारी २०२६ रोजी शहरातील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील मूलभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी त्यांनी शहरातील व्ही. एस. एस. कॉलेज, दिनदयाळ उपाध्याय हॉल (विद्युत कॉलनी), ऑक्सफर्ड इंग्रजी शाळा, जालना शहर महानगरपालिका प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा (विसावा) नुतन वसाहत, जालना, सीटीएमके गुजराती विद्यालय अशा एकूण ०५ ठिकाणी असलेल्या २१ मतदान केंद्रांची पाहणी केली.पाहणीदरम्यान मतदान केंद्रांवरील पुरेशी प्रकाश व्यवस्था, दार-खिडकींची स्थिती, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच दिव्यांग मतदारांसाठी रॅम्पची उपलब्धता याबाबत सखोल तपासणी करण्यात आली. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व मतदान केंद्रांवरील मूलभूत सुख-सुविधा वेळेत व योग्य प्रकारे उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी व आयुक्त जालना शहर महानगरपालिका आशिमा मित्तल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या पाहणीवेळी शहर अभियंता सय्यद सऊद, पाणीपुरवठा अभियंता अनिल भद्रे, विद्युत अभियंता श्रीमती कोमल गावंडे तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व सुरक्षित पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# भाविकांची पिळवणूक करणाऱ्या एजंटांवर प्रतिबंधात्मक कारवाई

अहिल्यानगर। प्रतिनिधी

शनिशिंगणापूर (ता. नेवासा) येथे देशभरातून येणाऱ्या भाविकांची एजंटांकडून (लटकू) होणारी आर्थिक पिळवणूक, फसवणूक व असुविधा रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरचे उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १५२ (१) अन्वये शिंगणापूर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

शनिशिंगणापूर हे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, शनिशिंगणापूर पोलीस ठाणे आणि नेवासा तहसीलदार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मंदिर परिसर तसेच गावाच्या बाहेरील रस्त्यांवर काही खासगी व्यक्ती (एजंट/लटकू) भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानांतूनच चढ्या दराने पूजा साहित्य खरेदी करण्यास भाग पाडतात. भाविकांनी यास विरोध केल्यास त्यांना दमदाटी व शिवीगाळ केली जाते. सन २०२५ मध्ये अशा प्रकारच्या ५३ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या प्रकारांमुळे भाविकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. १. वाहने अडविण्यास मनाई: शिंगणापूर गावाच्या बाहेरील किंवा गावातील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे, प्रवेश मार्ग किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अथवा त्यांच्या वाहनांना थांबविणे, अडविणे किंवा त्यांना विशिष्ट ठिकाणी जाण्यासाठी सक्ती करणे, यास तात्काळ प्रतिबंध करण्यात आला आहे. खरेदीची सक्ती नको: भाविकांना कोणत्याही विशिष्ट दुकानातून किंवा आस्थापनेतूनच खरेदी करणे, निवास करणे किंवा कोणताही व्यवहार करण्याचे सुचवू नये. याबाबत भाविकांना निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य राहील.

तोतयागिरीस प्रतिबंध : कोणत्याही खासगी व्यक्तीने स्वतःला देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये. मध्यस्थीस मनाई : भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीने मध्यस्थीचे व्यवहार करू नयेत. सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, या आदेशाने प्रभावित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला दिनांक २८/०१/२०२६ पर्यंत उपविभागीय दंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात उपस्थित राहून आपली बाजू किंवा हरकत नोंदवता येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना या आदेशाची कठोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## पक्षाच्या प्रतिनिधीने नियमाचे उल्लंघन केल्यास केंद्राबाहेर काढण्यात येईल-जिल्हाधिकारी
### उमेदवाराला मतदान केंद्रावर दिवसांमध्ये फक्त तीन वेळा भेट देता येईल

जालना। प्रतिनिधी

जालना महानगरपालिका निवडणूक मतदान व मतमोजणी प्रतिनिधींसाठी कडक नियमावली जाहीर करण्यात आली तसेच पक्षाच्या कोणत्याही प्रतिनिधीने नियमाचे उल्लंघन केल्यास मतदान केंद्राच्या बाहेर काढण्यात येईल असा इसारा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला आहे. १४ जानेवारी २०२६ रोजी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची महत्त्वाची बैठक संपन्न झाली. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी मित्तल म्हणाले की पक्षाच्या उमेदवारांनी मतदान केंद्रावर दिवसभरामध्ये फक्त तीन वेळेस भेट देता येईल असे निवडणूक आयोग चे नियमाचे पालन करणे गरजेचे आहे. सिद्धिकी इंजिनिअरिंग, औद्योगिक वसाहत फेज ३ येथे पार पडलेल्या या बैठकीत मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेदरम्यान पाळावयाचे नियम व प्रशासकीय व्यवस्थेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.



प्रतिनिधींसाठी मुख्य नियमावली आणि सूचना बैठकीत मतदान प्रतिनिधींसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली आहेत: प्रवेश आणि ओळख: निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेले अधिकृत ओळखपत्र आणि पास असल्याशिवाय केंद्रात प्रवेश मिळणार नाही. मतदान केंद्रावर उमेदवाराला दिवसभरात केवळ तीन वेळाच भेट देता येईल. मोबाईलवर बंदी: सुरक्षा कारणास्तव मतदान आणि मतमोजणी केंद्रावर कोणालाही मोबाईल फोन किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे नेण्यास पूर्णतः मनाई असेल. शिस्त आणि वर्तन मतदान केंद्रात शांतता राखणे अनिवार्य आहे. कोणत्याही मतदारावर दबाव टाकणे किंवा राजकीय चिन्हांचे प्रदर्शन करण्यास बंदी असेल. मतदानाची गोपनीयता भंग करणे हा गुन्हा मानला जाईल. मतमोजणी व्यवस्था: मतमोजणीसाठी उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना एकाच ठराविक गेटद्वारे प्रवेश दिला जाईल. सर्वांनी एकत्रितपणे प्रवेश करणे आवश्यक असून, मतमोजणी प्रक्रियेत प्रत्यक्ष हस्तक्षेप करण्यास मनाई असेल.

प्रशासकीय सज्जता आणि उपस्थिती : या बैठकीला निवडणूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस प्रशासनातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यामध्ये मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनियार, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अशीमा मित्तल,निवडणूक निरीक्षक हरिष धार्मिक, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, अपर पोलीस अधीक्षक आयुषकुमार नोपाणी, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, अति. आयुक्त अर्जुन गिराम,उपायुक्त नंदा गायकवाड आणि सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे यांचा समावेश होता. राजकीय पक्षांच्या वतीने सर्जेराव वाघ (रासप), ॲड. योगेश गुल्लापल्ली (आम आदमी पार्टी), संजोग हिवाळे (आम आदमी पार्टी) पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महत्वाची सूचना: नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रतिनिधींना केंद्राबाहेर काढले जाईल आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनातर्फे देण्यात आला आहे.

## संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त सुविधेचा शुभारंभ



जालना। प्रतिनिधी

केंद्र शासन मान्य अंतर्गत माजी सैनिकांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करून देणाऱ्या संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे आज हॉस्पिटलच्या दहाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सुविधेचा अधिकृत शुभारंभ समारंभपूर्वक पार पडला. या शुभप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कॅप्टन श्री. भानुदास सिरसाट उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी दर्जेदार, विश्वासार्ह व सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध होणे ही अत्यंत गौरवास्पद व आनंदाची बाब असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास कॅप्टन राधाकिसन औथाडे, कॅप्टन युनूस शेख, साहेबराव डाळवे , प्रकाश दराडे , नवघरे साहेब यांच्यासह मोठ्या संख्येने माजी सैनिक उपस्थित होते. तसेच डॉ. बळीराम बागल, डॉ. मिरकड, डॉ. राजगुरू, डॉ गोयल, डॉ रमेश सूर्य, अमोल कदम आदी नामांकित वैद्यकीय तज्ज्ञांची उपस्थिती लाभली. माजी सैनिक कल्याण कार्यालयाचे सानप साहेब यांनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली. योजनेअंतर्गत संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आता माजी सैनिक व त्यांच्या आश्रितांना आधुनिक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व गुणवत्तापूर्ण उपचार उपलब्ध होणार असून यामुळे जालना व परिसरातील माजी सैनिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलिसांचा आयजींच्या हस्ते गौरव

जालना। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी जालना दौऱ्यावर असताना गुन्हे आढावा बैठक घेतली. वावेळी त्यांनी अत्कृष्ट तपास करून गुन्हे उघडकीस आणणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचायांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित केले. मिश्र यांनी आगामी महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने मतमोजणी केंद्राची पाहणी केली तसेच गेल्या महिनाभरातील गुन्ह्यांचा आढावा घेतला. या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल आणि अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. जालना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची वेवसाईट हॅक करून जम्मू-काश्मीर आणि बिहार राज्यात बसून जालन्यातील वाहनधारकांना बनावट शिकाऊ परवाने वाटप करणाऱ्या दोन्ही आरोपीच्या मुसक्या आवळून स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हा उघड केला होता, याबद्दल महानिरीक्षक

वीरेंद्र मिश्र यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सायबर सेलचे पोलीस निरीक्षक गुणाजी शिंदे, सपोनि सचिन खामगळ, पौनेश उबाळे, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र जाधव, सायबर विभागाचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चव्हाण यांच्यासह अंमलदार प्रभाकर वाघ, सचिन चौधरी, इरशाद शेख, संदीप चिघोले, रमेश काळे व इतरांना प्रशस्तिपत्र देऊन गौरव केला, तसेच, कदीम जालना पोलीस ठाणे हहोतील अफगाण मोहालना रोधील शाळेसमोरून भरदिवसा अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध पोलिसांनी अवध्या काही तासात लावला आणि मुलीला तिच्या आईवडिलांच्या स्वाधीन केले. या तत्पर कारवाईबहुल कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे, पोलीस हवालदार सदा राठोड, बाबा गायकवाद, मतीन शेख, एस. व्ही. चव्हाण, महिला पोलीस अंमलदार एस. आर. बौराडे, चालक पोलीस हवालदार अशोक खरात यांना महानिरीक्षकांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/७४३
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १६/१२/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सदानंद अर्जुन सोळुंके सर्व्हे नं.-३४/२/सहन प्लॉट नं. ३० नं.प.मि.नं.१८-९१-३० चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-९१-३०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. २९
पश्चिम : प्लॉट नं. ३१
दक्षिण- १२ मिटर रुंदीचा डिपी रोड
उत्तरः प्लॉट नं. ३५

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# नगरसेवक राम लांडे दोन वर्षासाठी तीन जिल्ह्यातून हद्दपार?
## हद्दपार रद्द करण्यासाठी अपील करणार- राम लांडे

अंबड। प्रतिनिधी

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नगरसेवक राम लांडे हे नुकताच अंबड नगरपरिषद निवडणुकीतून विजय झालेले उमेदवार आहे त्यांचा प्रस्ताव पोलीस प्रशासन विभागाने अंबड उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर केला होता त्याचा निर्णय आज झाला आहे या निर्णयामध्ये तीन जिल्ह्यांमधून दोन वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. यासंदर्भात राम लांडे यांना विचारले असता ते म्हणाले की जे माझ्यावर झालेली कारवाई राजकीय होतो मधून करण्यात आली आहे मी नगरपरिषद निवडणूक मध्ये निवडून आल्यामुळे काही राजकीय पक्षांच्या लोकांना देखवत नसल्यामुळे ही कारवाई त्या माध्यमातून झाली असावे असे ते म्हणाले मी या प्रकरणी लवकरच अपील करणार आहे असे ते म्हणाले.

पोलीस अधिक्षक जालना यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर करून श्री. राम लांडे यांना हदपार करण्यासाठी विनंती करून खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे. मा.पोलीस अधिक्षक जालना यांचे कडील पत्र जा.क्र. स्थागुशा/हदपार /२०२५/५६७/ दिनांक १०.०३.२०२४अन्वये सामनेवाला श्री.राम लांडे वय ३० वर्ष रा. होळकर नगर अंबड यांचे विरूध्द मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम ५६ ब प्रमाणे हदपारीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेलाअसून त्यांनी सामनेवाला यास छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना या तीन जिल्हयातून दोन वर्षाकरीता हदपार करणे बाबत सिपारस केलेली आहे. सदर प्रस्तावामध्ये गुन्हे दाखल आहेत. यांच्या विरूध्दचा मुंबई पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ (ब) अन्वये हद्दपारी चा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. उक्त हा या आदेशाचे तारखे पासून दोन दिवसांचे आत रस्ते रेल्वे मार्गाने जालना, बीड व छत्रपती संभाजीनगर या तीन जिल्हयाच्या हद्दीतुन निघून जाईल किंवा त्याला घालवून दिले जाईल व त्या तारखेपासून एक वर्षाच्या मुदतीकरीता उक्त क्षेत्रात त्याने उपविभागीय दंडाधिकारी, उप विभाग अंबड व महाराष्ट्र शासनाच्या परवानगी शिवाय प्रवेश करु नये किंवा परत येऊ नये सामनेवाल्यास असे निर्देशित देण्यात येते की, या आदेशाच्या कालावधीत राज्यात इतरत्र राहील तेथील नजीकच्या पोलीस स्टेशनला त्याने महिन्यातुन एकदा त्याचे राहण्याच्या ठिकाणाचा संपुर्ण पत्ता व त्यात बदल झाला नाही तरी कळविण्यात यावा. तसेच सदर आदेशाचे कालावधीत तो महाराष्ट्र राज्याबाहेर निघुन जाण्याच्या १० दिवसांचे आत संबंधित पोलीस स्टेशनला त्याने माहिती पोस्टाने अगर इतर मार्गाने दिली पाहिजे. व महाराष्ट्र राज्यात आल्यानंतर १० दिवसांचे आत राहत असलेल्या भागाचे नजीकचे पोलीस स्टेशनला तशी माहिती दिली पाहिजे. जर सामनेवाल्याने विहीत वेळेत हदद सोडली नाही किंवा हददपार कालावधीत विनापरवाना प्रवेश केला, तर त्याच्या विरूध्द महा. पो. अधिनियम कलम १४२ अन्वये सदर आदेशाविरुध्द मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेकडे ३० दिवसाच्या आत अपील दाखल करण्याची मुभा राहील. सामनेवाला यांनी त्यांचे विधिज्ञामार्फत खलील प्रमाणे लेखी म्हणने सादर केले आहे. हे की, अर्जदार हे अंबड ता. अंबड येथील रहीवासी असून ते व्यवसायाने शेतकरी व सामाजिक कार्यकते आहेत. हे की, प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार यांना आपण यांना आपण महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे व कलम ५६ (ब) प्रमाणे पोलीस ठाणे अंबड घनसांवगी गोंदी तीर्थपुरी बदनापूर तालुका जालना या पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन वर्षासाठी हद्दपार करणेबाबत उपविभागीय दंडाधिकारी अंबड यांना शिफारस का करण्यात व्यात येऊ नये साठी यासंबंधी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५९ प्रमाणे नोटीस बजावलेली आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
गुरुवार दि.१५ जानेवारी २०२६ | ६

# शेतकरी हक्क मोर्चाच्या दणक्याने तूर खरेदी केंद्र सुरू

## किमान आधारभूत किंमती पेक्षा कमी दरात शेतमाल खरेदी केल्यास परवाना रद्द होणार !

बीड । प्रतिनिधी

शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीनुसार बीड जिल्हाधिकारी कार्यालयात कापूस, सोयाबीन व तूर खरेदी तसेच शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात महत्त्वपूर्ण प्रशासकीय बैठक पार पडली. ही बैठक अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उपनिबंधक, जिल्हा पणन अधिकारी व संबंधित विभागांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने शेतकऱ्यांना खरेदी प्रक्रियेत भेडसावणाऱ्या अडचणी मांडत कापूस खरेदी केंद्र (), सोयाबीन खरेदी केंद्र, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा साठा अधीक्षक अधिकारी तसेच सर्व खरेदी केंद्र चालकांची संयुक्त बैठक घेण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार ही बैठक संपन्न झाली.

बैठकीदरम्यान शेतकरी पुत्रांनी सोयाबीन खरेदी केंद्रांवर अनेक ठिकाणी हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी होत असल्याचे पुरावे सादर केले. तसेच खरेदी केंद्रांवर प्रतवारीच्या नावाखाली शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असल्याच्या तक्रारी मांडण्यात आल्या. यासोबतच शेतकऱ्यांची तात्काळ तूर खरेदी सुरू करण्यात यावी, अशी ठाम मागणी शेतकरी पुत्रांनी केली. यावर अप्पर जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ तूर खरेदी केंद्र सुरू करण्यात येतील तसेच उद्यापासून तुरीच्या नोंदी घेतल्या जातील, असे स्पष्ट केले.



शेतकरी पुत्र व जिल्हा प्रशासनाची बैठक संपन्न!; सोयाबीन व कापूस खरेदीदरम्यान प्रतवारीच्या नावाखाली लुट केल्यास तात्काळ कारवाई

बैठकीत बीड जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये शेतमालाची प्रतवारी ठरवण्यासाठी एकही ग्रेडरचे पद भरलेले नसल्याची गंभीर बाब समोर आली. आजपर्यंत शेतमालाची प्रतवारी व्यापाऱ्यांकडून ठरवली जात असल्याचे निदर्शनास आले. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रेडर पदे तात्काळ भरण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.

तसेच बीड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवाराबाहेर मार्केट फीस वसुली केली जात होती ती तात्काळ थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहे. या बैठकीत बीड जिल्ह्यातील शेतकरी, शेतकरी पुत्र व शेतकरी मित्रांची उल्लेखनीय एकजूट पाहायला मिळाली. या बैठकीस अप्पर जिल्हा दंडाधिकारी शिवकुमार स्वामी जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावर जिल्हा मार्केटिंग अधिकारी श्री भोसले व कापूस प्राधिकरण सीसीआय केंद्राचे केंद्रप्रमुख सोयाबीन खरेदी केंद्राचे केंद्रप्रमुख कृषी उत्पन्न बाजार समितीचे जिल्ह्यातील सर्व सचिव व विभागातील कर्मचारी उपस्थित होते

शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोकराव येडे, कुलदीप करपे, डॉ. गणेश ढवळे, गणेश नाईकवाडे, बाळासाहेब मोरे, शेतकरी मार्गदर्शक कालिदास आपेट, शेतकरी नेते अजय बुरांडे, सामाजिक कार्यकर्त्या सुशिलाताई मोराळे, जे. डी. तांदळे सर, अर्जुन सोनवणे, सुहास जायभाय, ज्ञानेश्वर राऊत, संगमेश्वर आंधळकर, रामेश्वर गाडे राजू गायके, अभिषेक शिंदे ,राजवीर महेश डोंगरे अमोल पाठक राधाकिसन पटेकर मधुकर गाडी शेख युनूस सुदाम तांदळे आदी उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान मंदिर गाभारा बांधकामासाठी सावरगाव ग्रामस्थांचा ३ कोटीचा निधी देण्याचा संकल्प

आष्टी । प्रतिनिधी

संपूर्ण भारत देशातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले नाथ संप्रदायाचे अग्रणी असलेल्या मच्छिंद्रनाथां नाथांची संजीवन समाधी असलेल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान येथील मंदिराचे गाभाऱ्याचे दगडी बांधकाम सुरू असून या कामासाठी स्थानिक सावरगाव ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने ३.०० कोटी रु.देणगी देण्याचा निश्चय केला असून.. याबाबत झालेल्या पहिल्याच बैठकीमध्ये ६५ लक्ष रु.जमा झाले आहेत.. श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे विश्वस्त आ.सुरेश धस यांनी घेतलेल्या सावरगाव ग्रामस्थांसमवेत घेतलेल्या विकास आढावा बैठकीमध्ये अशा प्रकारचा निर्णय झाल्याची माहिती श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे विश्वस्त ॲड.साहेबराव म्हस्के यांनी दिली.



या बैठकीस विश्वस्त समितीचे अध्यक्ष दादासाहेब चितळे, सचिव बाबासाहेब रामभाऊ म्हस्के, उपाध्यक्ष बाबासाहेब महादेव म्हस्के, विश्वस्त रमेश बाबुराव ताठे पाटील, नवनाथ म्हस्के, सावरगाव ग्रामपंचायतचे सरपंच अर्जुन म्हस्के हे उपस्थित होते.ॲड.म्हस्के म्हणाले की, श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान मंदिराचा गाभारा हा आंध्र प्रदेश,कर्नाटक सीमेवरील दर्जेदार दगडातून निर्माण होत असून या कामासाठी सध्या ७३.०० कोटी रु.खर्चाचे अंदाजपत्रक असून ..आणखी ३ वर्षांनी हा खर्च १०० कोटी रुपये पर्यंत हा वाढू शकतो. १०० १५० फूट आकाराचा हा गाभारा असून सुमारे १०९ फूट उंचीचा आहे हे काम संपूर्ण दगडी बांधकाम होणार आहे.. या कामासाठी तीन वर्ष कालावधी लागण्याचा अंदाज आहे.सावरगाव येथील स्थानिक ग्रामस्थांनी या कामासाठी ३.०० कोटी रुपये निधी देण्याचा संकल्प केला असून या एकाच बैठकीमध्ये ६५ लाख रुपये निधी जमा झाला.

# स्वीकृत सदस्यासाठी राष्ट्रवादीचे तीन तर भाजपाच्या वतीने दोन

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिकेमध्ये आज नगरपरिषद उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्यासाठी निवडणूक होणार असून उपाध्यक्ष पदासाठी चुरस असली तरी स्विकृत सदस्यासाठी नियमानुसारच अर्ज आलेले आहेत. यामध्ये दोन्ही राष्ट्रवादीचे मिळून तीन आणि भाजपाचे दोघांनी अर्ज दाखल केले.




बुधवार दिनांक १४ जानेवारी रोजी बीड नगरपालिकेच्या स्विकृत सदस्य पदासाठी अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे दोन यामध्ये दिनेश मुंदडा व मोईन मास्टर यांनी तर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या वतीने मकसूद खान यांनी अर्ज दाखल केला तर भाजपाच्या वतीने गोविंद शिराळे व रवी कदम यांचा अर्ज दाखल करण्यात आला आहे .आज या अर्जावर निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

# मंत्री पंकजा मुंडे यांचा स्व.रविंद्र बांगर यांच्या कुटुंबीयास आर्थिक मदतीचा हात

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपरनई भागातील बांगर वाडा या ठिकाणी मागील आठवड्यामध्ये कैलासवासी रवींद्र काशिनाथ बांगर यांचा डोंगरामध्ये शेळ्या सांभाळत असताना एक साधे मोहोळ झाडताना मोहोळाच्या माशा चावत असल्यामुळे स्वतःच्या संरक्षणार्थ तोंडाला प्लास्टिकची पिशवी गुंडाळल्यामुळे ऑक्सिजनचा पुरवठा मिळाला नसल्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाला होता*.





आज दिनांक १४ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री व बीड जिल्ह्याच्या पालक आदरणीय पंकजाताई साहेब मुंडे यांनी सदर कुटुंबास रोख स्वरूपात आर्थिक मदत डॉक्टर अभय वनवे यांच्या मार्फत पोहोच केली, कुटुंबास आधार दिला व या कुटुंबाच्या पाठीमागे उभे राहण्याचे व भविष्यातही काही अडचण निर्माण झाली तर मदत करण्याचे आश्वासन दिले लोकनेते गोपीनाथ मुंडे अपघात विम्याच्या माध्यमातून व मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत देण्याचे अभिवचन ताई साहेब यांनी याप्रसंगी दिले.याप्रसंगी भाजपाचे वैद्यकीय आघाडीचे प्रदेशाचे उपाध्यक्ष डॉक्टर अभय वनवे उपस्थित होते.रवींद्र बांगर यांच्या पश्चात पत्नी श्रीमती सुरेखा बांगर वय २२ वर्ष व तीन वर्षाची मुलगी आहे.

# स्वच्छता न झाल्यास रविवारी पालिकेसमोर बाजार

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषद हद्दीतील आठवडी बाजार, भाजी मंडई आणि इतर व्यावसायिक भागातील घाणीच्या प्रश्नाने व्यापारी वर्ग संतापला आहे. मोमीनपूरा मुख्य रस्ता, नवीन भाजी गंडई, राजीवगांधी चौक, नगर नाका मच्छी मार्केट आणि पालवन चौक या भागात स्वच्छता न होण्यामुळे व्यापाऱ्यांना घाणीवर बसून व्यवसाय करावा लागत आहे. या घाणीमुळे दुर्गंधी, रोगराईचा धोका आणि भाजी-पाला, फळांवर जंतूंचा प्रादुर्भाव होत असल्याने ग्राहकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे. नगरपरिषदेकडून ठेकेदार मार्फत १० व २० रुपये कर आकारला जात असूनही स्वच्छता होत नसल्याचा आरोप करत व्यापाऱ्यांनी इशारा दिला आहे की, स्वच्छता केली नाही तर येणाऱ्या रविवारी नगरपरिषद कार्यालयासमोरच आठवडी बाजार भरविणार!बीड शहरातील दैनंदिन आणि आठवडी बाजारातील व्यापारी संघटनेने नगरपरिषदेला सादर केलेल्या विनंती अर्जात या सर्व समस्या कागदोपत्री नोंदवल्या आहेत. मोमीनपूरा, पालवन चौक, नवीन भाजी मंडई आदी भागात नगरपरिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून योग्य स्वच्छता होत नसल्याचे व्यापाऱ्यांनी नमूद केले आहे. ''आम्ही दररोज कर भरतो, पण घाणीवर बसून व्यापार करावा लागतो. दुर्गंधीमुळे रोगांचा धोका वाढला आहे आणि भाजी-पाला दूषित होत आहेत,'' असा संताप व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. दर रविवारी सकाळी आठवडी बाजार परिसर पूर्णपणे स्वच्छ करावा, मोकाट जनावरे कोंडवाड्यात टाकावीत आणि भाजी मार्केटमध्ये आठवड्यात तीन वेळा स्वच्छता करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.मात्र, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी सूचना दिल्यावरही ते परिसर स्वच्छ न करता निघून जात असल्याचा आरोप आहे. यामुळे २०० ते ३०० भाजी विक्रेते सुभाष रोड आणि नगरपालिका समोरच बसून व्यवसाय करतात, ज्यामुळे रहदारीला अडथळा होतो आणि नागरिकांना त्रास होतो. पूर्वी अर्ज दिल्यावरही काहीच हातकळी झालेली नाही, त्यामुळे व्यापारी आता तीव्र पावले उचलण्यास तयार झाले आहेत. ''स्वच्छता न झाल्यास पुढील रविवारी नगरपरिषद कार्यालयासमोर बाजार भरविणार आहोत. सुभाष रोडवर दुकाने लावणार किंवा पालिकेसमोरच मंडई भरविणार,'' असा इशारा व्यापाऱ्यांनी दिला आहे.या घाणीच्या समस्येने शहरातील बाजारपेठा अस्वच्छ झाल्या असून, ग्राहकवर्गही कमी होत आहे. मोकाट जनावरांमुळे बाजारात चोहीकडे शेण सापडते, ज्यामुळे दुर्गंधी वाढते. व्यापाऱ्यांनी नगरपरिषद प्रशासनाला तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली असून, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून अद्याप ◂◂ पान ३ वर

# मलकाचीवाडी येथे जलसंधारणाच्या कामाचा शुभारंभ

## गावाच्या सर्वांगीण विकासासाठी जलसंधारण कामाची गरज- तहसीलदार घोळवे

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील मलकाचीवाडी येथे वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या इटॉन फाउंडेशन अर्थसहाय्याने जलसंधारण डीपसीसीटी अर्थात खोल सलग समतल चर कामाचा शुभारंभ तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला आहे.

यावेळी बोलताना तहसीलदार सुरेश घोळवे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधताना सांगितले की वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट संस्थेच्या माध्यमातून तुम्हाला चालुन आलेली एक संधी आहे, या संधीचा शेतकऱ्यांनी फायदा करून घ्यावा.



शासनाची काही मदत लागली तर आम्ही सर्वोतोपरी तत्पर आहोत.अतिवृष्टीच्या वेळी महापुराच्या रूपाने वाहून जाणारे पावसाचे पाणी या जलसंधारण कामामुळे थांबणार आहे. पाऊस पडल्यानंतर ते थांबुन जमिनीत मुरणार आहे, त्यामुळे विहिरींची बोअरची तलावांची पाणीपातळी वाढणार आहे. पावसाळ्यात या कामावर वृक्षारोपण करण्याचे अवाहन ही यावेळी गावकऱ्यांना त्यांनी केले. सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर आलेल्या पुराने शेतजमीन खरडून गेली व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून माथा ते पायथा जलसंधारण होणे आवश्यक आहे.मलकाचीवाडी हे एक मॉडेल गाव नक्कीच सर्वांच्या सहकार्याने तयार करू असे आश्वासन ग्रामस्थांनी तहसीलदार घोळवे मान्यवरांना दिले आहेत यावेळी मलकाचीवाडीचे सरपंच मच्छिंद्र चव्हाण, माजी उपसभापती जालिंदर ◂◂ पान ३ वर

# राष्ट्रीय स्तरावरील 'बेस्ट अबॅकस टीचर' पुरस्काराने अर्चना पवार यांचा गौरव




जामखेड येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान

पाटोदा । प्रतिनिधी

ग्लोबल व्हिजन फाऊंडेशन, पुणे संचलित इन्स्पायर अबॅकस ॲंड वेदिक मॅथ अकॅडमी यांच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात 'बेस्ट अबॅकस टीचर' पुरस्काराने सौ. अर्चना पवार यांना सन्मानित करण्यात आले. दि. ११ जानेवारी २०२६ रोजी जामखेड जि. अहील्यानगर येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, सिने अभिनेते बाळू वाळुंजकर, ॲड. महेश वारे, मा.प्रा. मधुकर राळेभात (माजी जि.प.सदस्य), अमोल तातेड (जिल्हाध्यक्ष, भारतीय जैन संघटना अहिल्यानगर), मा.प्रा.धनंजय भोसले (संचालक, मॅथ वर्ल्ड क्लासेस) ◂◂ पान ३ वर

# राशन कार्ड उपलब्ध करून देऊ, संपर्क करा- माजी नगरसेवक सय्यद एजाज

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील तय्यब नगर, अचानक नगर परिसरातील नागरिकांना राशन कार्ड संदर्भात अडचणी निर्माण झालेल्या असून, ज्यांना राशन कार्ड नाही, अशा सर्व नागरिकांनी आमच्याशी संपर्क करावा, असे आवाहन माजी नगरसेवक सय्यद एजाज मेंबर यांनी केले आहे.



गेवराई शहरातील अनेक नागरिकांना राशन कार्ड नसल्याने अनेक अडचणी निर्माण होत आहेत. सरकारी, निमसरकारी यंत्रणेकडून राशन कार्डची मागणी केली जाते. त्यासाठी, अनेक वेळा तहसील कार्यालयात चकरा मारून ही, संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी टाळाटाळ करतात. सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे, गेवराई शहरातील तय्यब नगर, अचानक नगर परिसरातील नागरिकांना अद्याप पर्यंत राशन कार्ड मिळाले नाही. ज्यांनी अर्ज दाखल करून ही, राशन कार्ड मिळाले नाही. अशा सर्व नागरिकांनी आमच्याशी संपर्क करावा. असे आवाहन माजी नगरसेवक सय्यद एजाज मेंबर यांनी केले आहे.

# जिव्हाळा ग्रुपची गड किल्ल्यांवर पद भ्रमंती

माजलगाव । प्रतिनिधी

येथील जिव्हाळा ग्रुपने महाराष्ट्रातील लोणावळा येथून जवळच असलेल्या राजमाची व कोराईगड या किल्ल्यावर दि. ८ ते १० जानेवारी दरम्यान पदभ्रमंती केली.




सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जिव्हाळा ग्रुपच्या वतीने दरवर्षी वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, गडकिल्ले पदभ्रमंती असे उपक्रम राबविले जातात. यापूर्वी जिव्हाळा ग्रुपने महाराष्ट्रातील मकरंदगड, प्रतापगड, तुंग, तिकोना, लोहगड, विसापूर, हरिहर, भंडारदुर्ग, भास्करगड, साल्हेर, मुल्हेर, मांगी, तुंगी, शिवनेरी, हडसर, जीवधन, चावंड, कळसूबाई, रतनगड, हरिश्चंद्रगड या किल्ल्यांवर पदभ्रमंती केली आहे. यावेळी राजमाची व कोराईगड या किल्ल्यावर पदभ्रमंती केली. राजमाची किल्ला ८३३ मीटर उंच आहे. या किल्ल्यावर श्रीवर्धन व मनरंजन असे दोन बालेकिल्ले आहेत. कोराईगड किल्ला ९२३ मीटर उंच आहे. या किल्ल्यावर कोराई देवीचे मंदिर व मोठे तळे आहे. अखंड तटबंदी हे या किल्ल्याचे वैशिष्ट्य आहे. या पदभ्रमंती मोहिमेमध्ये डॉ. राजेश रूद्रवार, सतीश सोळंके, नारायण टकले, डॉ. दत्ता भुजबळे, सुदाम बादाडे, बालासाहेब झोडगे, प्रा. गोविंद कराड, विठ्ठल धुमाळ, नागनाथ हंगरगे, डॉ. सुनील मोरे, संजय नरवडे, प्रा. नंदकुमार पैठणकर, श्रीमंत राऊत, दिलीप तौर, शंकर राऊत सहभागी झाले होते.

# गोरक्षनाथ टेकडी येथे 'गर्भागिरी' प्रदक्षणा संपन्न

बीड । प्रतिनिधी

गुरुवर्य वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांनी सुरू केलेल्या गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य महंत शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या भव्य दिव्य पालखी सोहळ्याने गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा सुरू करण्यात आली दरवर्षी पौष वद्य एकादशी श्री क्षेत्र त्रिंबकेश्वर येथे संत निवृत्तीनाथ महाराज यांची ब्रम्हगिरी पर्वत प्रदक्षिणा यात्रा निघत असते ज्या भाविक भक्तांना ब्रह्मगिरी येथे प्रदक्षिणेला जाता येत नाही अशा भाविक भक्तांना गुरुवर्य किसन बाबा महाराजांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा गुरुवर्य गोरक्षनाथ महाराजांच्या सानिध्यामध्ये सुरू केलेली आहे.



शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे भव्य पालखी सोहळा

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या पालखी सोबत टाळ, मृदुंग , विना,ढोल ताशे, हलगी पथक, वाजवत, हरिनामाचा जयघोष करत गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या पालखीच्या ने गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा सुरवातीला केली संत महंत टाळकरी विणेकरी वारकरी ध्वजधारी यांच्या पाठीमागे हजारो भाविक भक्त गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा मध्ये उपस्थित होते


गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणेचे अध्यात्मिक महत्त्व

संत गहिनीनाथ महाराज यांना गुरु गोरक्षनाथ महाराज यांचा कृपाशीर्वाद होता गहिनीनाथ महाराजांनी संत निवृत्तीनाथ महाराजांना ◂◂ पान ३ वर

# विद्यापीठ नामविस्ताराचा लढा हा समतेसाठी होता -साथी लोमटे

किल्लेधारुर । प्रतिनिधी

विद्यापीठ नामविस्ताराचा लढा हा समतेसाठी होता. मराठवाड्यातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील दलित, वंचित, शोषित, स्त्रीया या सर्वांच्या त्यागाने विद्यापीठ नामविस्ताराची चळवळ यशस्वी झाली असे मत राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त आयोजित नामांतर आंदोलनाचा अन्वयार्थ या विषयावर भाष्य करताना नामांतर लढवय्ये तथा कामगार नेते श्री. सुभाष लोमटे यांनी व्यक्त केले. विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्ताने इतिहास विभाग, सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व्याख्यानाच्या आयोजन करण्यात आले. विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या ज्ञानाचा सागर असलेल्या महामानवाचे नाव विद्यापीठाला मिळाल्याने त्यांच्या कार्याचा निश्चितच गौरव झाला आहे. मात्र प्रत्येकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून कार्य केल्यास विद्यापीठाचा नावलौकिक वाढेल असे सांगितले.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी नामविस्ताराच्या रूपाने जगामध्ये ज्यांच्या बुद्धिमत्तेचा गौरव होतो. अशा महान व्यक्तिमत्त्वाचे नाव विद्यापीठाला मिळण्यासाठी ◂◂ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरूवार दि.१५ जानेवारी २०२६ | पान ७

# वाहतूक कोंडी आणि पाण्याचा प्रश्न सोडवणारच!
# रामभाऊ दाभाडे यांनी मांडली भूमिका

वाघोली - पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३ मध्ये भाजपा-आरपीआय महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार दौरा जोमात सुरू असून, विविध भागांतून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अशी माहिती उमेदवार रामभाऊ दाभाडे यांनी दिली.

विमाननगर येथील कोणार्क कॅम्पस, रोहन मिथिला सोसायटी, लुंकड गोल्ड कॉस्ट तसेच वाघोली परिसरातील कमल बाग, जेड रेसिडेन्सी (फेज १ व २), मॅजेस्टिक सिटी, रेन्बो ग्रेस, डायमंड क्रिस्ट, रेवा सोसायटी आदी ठिकाणी उमेदवारांनी भेटी देत नागरिकांशी थेट संवाद साधला. या प्रचार दौर्यादरम्यान पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, पार्किंग व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा,

हरित क्षेत्रे तसेच इतर नागरी मूलभूत



सुविधा या प्रमुख विषयांवर उमेदवारांनी आपली विकासाची स्पष्ट भूमिका मांडली. नागरिकांच्या समस्या, अपेक्षा व सूचनांची नोंद घेत त्यावर प्रभावी व वेळबद्ध उपाययोजना करण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला.अ गटाचे उमेदवार श्रेयस खांदवे म्हणाल्या, आरोग्य, वाहतूक आणि मूलभूत सुविधा या विषयांवर ठोस आणि कालमर्यादेत काम करणे ही आमची प्राथमिकता आहे.

ब गटाचे उमेदवार अनिल सातव यांनी सांगितले, नागरिकांच्या दैनंदिन अडचणी समजून घेऊन त्यावर कायमस्वरूपी उपाय करणे हेच आमचे ध्येय आहे.क गटाच्या उमेदवार ऐश्वर्या पठारे म्हणाल्या, लोकांशी सातत्यपूर्ण संवादातूनच विकास घडतो. प्रभाग क्रमांक ३ चा विकास आधुनिक, सुरक्षित व नियोजनबद्ध असायलाच हवा.

ड गटाचे उमेदवार रामदास दाभाडे यांनी, लोकसहभागातूनच खरा विकास साध्य होतो आणि तोच आमच्या कार्यपद्धतीचा पाया असेल, असा विश्वास व्यक्त केला. या प्रचार दौर्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभत असून प्रभाग क्रमांक ३ मध्ये विकासकेंद्रित, लोकाभिमुख नेतृत्वाबाबत सकारात्मक वातावरण तयार झाले आहे.

प्रभाग क्रमांक ३ च्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या प्रश्नांचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी भारतीय जनता पार्टी कटिबद्ध आहे. येणार्या निवडणुकीत आपल्या भागाच्या उज्ज्वल भविष्यासाठी कमळ चिन्हासमोरील बटन दाबून आपल्या लाडक्या उमेदवाराला प्रचंड बहुमताने विजयी करा आणि विकासाचा हा रथ अधिक वेगाने पुढे नेण्यासाठी साथ द्या.

- रामभाऊ दाभाडे, प्रभाग क्रमांक ३ चे उमेदवार

# पिंपरी चिंचवडमध्ये भीषण अपघात, दोन सख्ख्या बहिणी ठार

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवडमधील काळेवाडी परिसरात आज दुपारी भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये दोन सख्ख्या बहिणींचा जागीच मृत्यू झाला आहे. धनगर बाबा मंदिरासमोर असलेल्या पेट्रोल पंपाजवळ हा अपघात घडला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



दुपारी सुमारे १ वाजून १५ मिनीटांच्या सुमारास हा अपघात झाला आहे. मृत बहिणींची नावे ऋतुजा पांडुरंग शिंदे (वय २४) आणि नेहा पांडुरंग शिंदे (वय २०) अशी असून त्या पुण्यातील पुनावळे परिसरातील रहिवासी होत्या. अपघाताच्या वेळी दोघी बहिणी दुचाकी (एमएच १४ केएम ९९६८) वरुन जात होत्या. याच दरम्यान मागून आलेल्या आयशर ट्रकने (एमएच ४० डीसी ०९६४) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेचा जोर इतका तीव्र होता की दोघींनाही गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. हा ट्रक जितेंद्र निराळे (मूळ रहिवासी - मध्य प्रदेश) चालवत असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच काळेवाडी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. काळेवाडी पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. याबाबत माहिती देताना काळेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांनी चालकाला ताब्यात घेण्यात आले असून घटनेचा पुढील तपास सुरू असल्याचे सांगितले आहे.

# बारामतीत रासप, दोन अपक्ष नगरसेवकांची राष्ट्रवादीला साथ

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती नगरपालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने सत्ता स्थापन केल्यानंतर नगरपालिकेतील गटनेते, उपगटनेते तसेच विविध समित्यांच्या प्रभारी पदांची निवड करण्यात आली. यावेळी रासप, दोन अपक्षांनी राष्ट्रवादीला पाठिंबा दिल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सत्ता असलेल्या नगरपरिषदेत बळ वाढले आहे. या घडामोडींमुळे विरोधकांचा आवाज क्षीण होणार असल्याची प्रतिक्रिया उमटली आहे.

या प्रक्रियेमुळे नगरपालिकेतील राजकीय हालचालींना वेग आला असून विरोधी पक्षनेतेपद कोणाकडे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अशा परिस्थितीत नगरपालिकेतील निवडून आलेल्या तीन नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसला जाहीर पाठिंबा दिल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाच्या नगरसेविका वनिता अमोल सातकर यांनी सहयोगी पक्ष राष्ट्रवादीला पाठिंबा दिला आहे. अपक्ष नगरसेवक निलेश भारत इंगुले व मनीषा संदीप बनकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला पाठिंबा देत



सत्ताधारी गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. नगरसेवकांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची नगरपालिकेतील ताकद आणखी वाढली असून विरोधकांची संख्या कमी झाली आहे. परिणामी विरोधी पक्षनेतेपदाबाबतची चर्चा आता अधिकच गुंतागुंतीची झाली आहे. राष्ट्रवादीला मिळालेल्या या पाठिंब्यामुळे आगामी काळात नगरपालिकेतील निर्णयप्रक्रियेत सत्ताधारी गटाचा प्रभाव अधिक मजबूत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या घडामोडींमुळे बारामतीतील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून पुढील काळात आणखी काही नगरसेवक सत्ताधारी गटात सामील होतील का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. बारामती नगरपरिषद निवडणुकीत सत्ताधारी राष्ट्रवादीला पहिल्यांदा सोपी वाटणारी निवडणूक शेवटच्या टप्प्यात चुरशीची झाली. निकालानंतर रासप, शरद पवार यांच्या पक्षाला एक, दोन अपक्ष असा कौल मिळाला होता. त्यामुळे बारामतीवर कमांड असलेल्या अजित पवार गटाला धक्का मानला जात होता. अपक्ष उमेदवारांची चर्चा निकालानंतर राज्यात गाजली होती. मात्र, नगरपरिषदेच्या समितींच्या पदांच्या निवडीत रासप, दोन अपक्ष नगरसेवकांनी सत्ताधारी पक्षाच्या गोटात जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे हे नगरसेवक सत्तेच्या सारीपाटावर विराजमान झाले आहेत.

# लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी पदभार स्वीकारला

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

राजगुरुनगर नगरपरिषदेचे लोकनियुक्त प्रथम नगराध्यक्ष म्हणून मंगेश वसंतराव गुंडाळ यांनी आज (दि. १२) मोठ्या उत्साहात पदभार स्वीकारला. याचवेळी झालेल्या विशेष सभेत मनोहर सांडभोर यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने या नगरपरिषद निवडणुकीत मोठे यश मिळवले असून, पदग्रहण सोहळ्यास सर्वपक्षीय नगरसेवक, नागरिक व विविध पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजगुरुनगर नगरपरिषदेसाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले होते, तर २१ डिसेंबरला मतमोजणी पार पडली. या निवडणुकीत मंगेश गुंडाळ यांची नगराध्यक्षपदी मोठ्या मताधिक्याने निवड झाली. नगरपरिषदेत एकूण १० नगरसेवक निवडून आले असून (त्यापैकी १ बिनविरोध), राष्ट्रवादी काँग्रेसचे ५, भाजपचे ४ आणि २ अपक्ष



नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. या निकालात शिंदे गटाच्या शिवसेनेने नगराध्यक्षपदावर आपला ठसा उमटवला आहे. सोमवारी (दि. १२) नूतन पदाधिकार्यांचा पदग्रहण सोहळा पार पडला. मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी पदाधिकार्यांचे स्वागत केले. नगरपरिषद कार्यालय रांगोळी, फुलांच्या माळा व पायघड्यांनी सजवण्यात आले होते. सकाळी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी पदभार स्वीकारला, तर दुपारी साडेबारा वाजता झालेल्या विशेष सभेत मनोहर सांडभोर यांची उपनगराध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. शिंदे गटाकडून सचिन मधवे, तर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून सागर सातकर यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड झाली.

उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांच्या समर्थकांनी गुलाल उधळत व डीजेच्या तालावर मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला.या वेळी शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष व माजी पंचायत समिती सभापती भगवान पोखरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, सचिन लांडगे, नगरसेवक वैभव घुमटकर, निलेश घुमटकर यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक उपस्थित होते. पदभार स्वीकारण्यापूर्वीच शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यास सुरुवात करण्यात आली असून, पुढील काळात विकासकामांना गती दिली जाईल, असे अतुल देशमुख यांनी सांगितले. भगवान पोखरकर यांनी राजगुरुनगर व चाकण नगरपरिषदेत शिवसेनेची निर्विवाद सत्ता प्रस्थापित झाल्याबद्दल मतदारांचे आभार मानले. तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका पक्ष स्वबळावर लढविण्याची घोषणा केली. या निकालामुळे पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिंदे गटाच्या शिवसेनेचा प्रभाव अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले असून, राजगुरुनगरच्या सर्वांगीण विकासाबाबत नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

# राष्ट्रवादीच्या पराभूत उमेदवाराला दौंडमध्ये कोयत्यानं मारहाण

दौंड । प्रतिनिधी

तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. दौंड पोलीस ठाण्यासमोरच राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या पराभूत उमेदवाराला कोयत्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही संपूर्ण गटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.



याप्रकरणी पोलिसांनी अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. आफताब सय्यद असं मारहाण झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्याचं नाव आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, आफताब सय्यद यांना वैयक्तिक कारणावरुन मारहाण झाल्याची माहिती मिळाली आहे.

वैयक्तिक कारणावरुन जमावाकडून आफताब सय्यद यांना मारहाण केली

दौंड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नगरपालिका निवडणुकीतील पराभूत उमेदवारावर भर चौकात कोयता उगारून बेदम मारहाण करण्यात आली आहे. वैयक्तिक कारणावरुन जमावाकडून दौंड नगरपरिषद निवडणूक लढवणाऱ्या आफताब सय्यद या उमेदवाराला दौंड पोलीस ठाण्यासमोरच बेदम मारहाण करण्याचा प्रकार घडला आहे. हा सगळा प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. भर चौकात मारहाण आणि धिंगाणा घालणाऱ्या टोळक्यावर पोलिसांकडून अद्याप कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळं दौंड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात आहे.

# 'विश्व अनुभूती' महोत्सवात पौराणिक कथांतून व्यवस्थापन कौशल्यांचे दर्शन; लेखक अक्षत गुप्ता यांचे मार्गदर्शन

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील प्रसिद्ध 'विष्वकर्मा समूह ऑफ स्कूल्स'च्या वतीने आयोजित 'विश्व अनुभूती' महोत्सवाचा तिसरा सोहळा उत्साहात पार पडला. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण 'द हिडन हिंदू त्रयी' या राष्ट्रीय बेस्टसेलिंग पुस्तकाचे लेखक अक्षत गुप्ता होते. त्यांनी आपल्या ओघवत्या शैलीत भारतीय महाकाव्यांकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन मांडत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या महोत्सवाचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे डॉ. तृप्ती अग्रवाल (चेअरपर्सन, विष्वकर्मा समूह) यांच्या नेतृत्वाखाली 'ओपन हार्ट्स क्लब' या अभिनव उपक्रमाची घोषणा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सामाजिक आणि




भावनिक आरोग्यासाठी हा क्लब काम करणार आहे. मानसिक आरोग्याविषयी मोकळेपणाने चर्चा करणे आणि विद्यार्थ्यांना आव्हानांचा सामना करण्यासाठी मानसिकदृष्ट्या सक्षम करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

समूहाचे अध्यक्ष डॉ. भरत अग्रवाल यांनी आगामी वर्षाची दिशा स्पष्ट करताना विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि कल्याण याला प्राधान्य दिले. आजच्या 'ऋशप न' पिढीच्या आकांक्षा समजून घेणे आणि दैनंदिन कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

मुख्य वक्ते अक्षत गुप्ता यांनी आपल्या भाषणात रामायण व इतर महाकाव्यांमधील उदाहरणे दिली. हिंदू कथा या केवळ कथा नसून ते तत्वज्ञान आणि आध्यात्मिक ज्ञानाचा मोठा स्रोत आहेत, असे त्यांनी नमूद केले. श्रीरामाच्या जीवनातील प्रसंगांतून त्यांनी तर्कशक्ती, संघभावना आणि तणाव व्यवस्थापन (डींर्शीी चरपरसशाशपीं) यांसारखी महत्त्वाची मूल्ये उलगडून दाखवली.यंदाच्या महोत्सवाची थीम 'बॅक टू कॉलेज' ही होती, ज्यामुळे उपस्थित कर्मचाऱ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. २,००० हून अधिक सदस्य असलेल्या या स्नेहसंमेलनात समूहाच्या विविध युनिट्समधील कर्मचाऱ्यांनी उत्साही नृत्य आणि नाटके सादर केली. या सोहळ्याला विष्वकर्मा समूहाचे संस्थापक राजकुमार अग्रवाल, अमिता अग्रवाल आणि समूहाच्या नेतृत्व संघासह पुढील पिढीचे सदस्य उपस्थित होते. या मेळाव्यात कर्मचाऱ्यांचा सत्कार आणि ध्येय निश्चितीची सत्रेही पार पडली.

# आंबेगाव-शिरूरमधील तीर्थक्षेत्रांचा कायापालट होणार! दिलीप वळसे पाटलांच्या प्रयत्नातून १.४५ कोटींचा निधी मंजूर

मंचर । प्रतिनिधी

आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या प्रयत्नातून पुणे जिल्हा परिषद-ग्रामीण पंचायत विभागामार्फत आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील तीर्थक्षेत्र विकास कामांसाठी १ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



या निधीतून श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथील गणपती मंदिर भक्त निवासासाठी २५ लाख रुपये, सिद्धेश्वर मंदिर भक्त निवासासाठी २५ लाख रुपये, चास येथील संत ज्ञानेश्वर महाराज रेडा समाधी भक्त निवासासाठी २५ लाख रुपये, केंदुर कान्होजी महाराज समाधी मंदिराकडे जाणार्या रस्त्याच्या सुधारणेसाठी २५ लाख रुपये,

तसेच शिरूर तालुक्यातील विविध मंदिरांकडे जाणार्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी १५ लाख रुपयांचा समावेश आहे. याशिवाय मोराची चिंचोली येथील भक्त निवास दुरुस्तीसाठी ३० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या सर्व कामांसाठी एकूण १ कोटी ४५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# कृषी केंद्रात चोरी करणारी 'चाकण गँग' जेरबंद; पोलिसांना 'त्या' गुप्त माहितीने लावला छडा

मंचर । प्रतिनिधी

मंचर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पेठ (ता. आंबेगाव) येथील खत व औषधाच्या दुकानात चोरी करणार्या दोन सराईत चोरट्यांना मंचर पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे ८ लाख ११ हजार २०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पेठ येथील किरण कैलास कुंदळे यांच्या सह्याद्री कृषी उद्योग या खत-औषध दुकानात १ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी चोरी केली होती.

या चोरीत दुकानातील ३ लाख ११ हजार २०५ रुपयांची खते, औषधे व बियाणे चोरून नेण्यात आली होती. याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की चोरीचा माल इर्टिगा कारमधून (एमएच १५ डीएम ८१२७) मंचर ते सुलतानपूर रोडवरील



नवीन पुणे-नाशिक महामार्गावरील पुलाखाली विक्रीसाठी आणला जाणार आहे. पोलिसांनी कारवाई करत घटनास्थळी छापा टाकला. त्यावेळी संतोष पोपट नलावडे (वय ३४, रा. नाणेकरवाडी, चाकण) व अमर संतोष नायक (वय १९, रा. खराबवाडी) या दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी आरोपींकडून सुमारे ५ लाख रुपये किमतीची इर्टिगा कार तसेच चोरीतील ३ लाख ११ हजार २०५ रुपयांची खते,औषधे व बियाणे असा एकूण ८ लाख ११ हजार २०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे व उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीकांत कंक्राळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील बड्गुजर यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस हवालदार नंदकुमार आढारी करत आहेत.

# चाकण नगरपरिषदेत महिलाराज! उपनगराध्यक्षपदी शिवसेनेच्या सुवर्णा शाम राक्षे यांची निवड

चाकण - चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत शिवसेनेच्या (शिंदे गट) नगरसेविका सुवर्णा शाम राक्षे यांची बहुमताने निवड झाली. नगराध्यक्षा मनिषा सुरेश गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष या दोन्ही पदांवर आता महिलांची वर्णी लागली आहे.

मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व गटनेते नितीन गोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक ३ (अ) च्या नगरसेविका सुवर्णा शाम राक्षे यांची उपनगराध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडणुकीसाठी सूचक म्हणून ज्येष्ठ नगरसेवक प्रकाश लक्ष्मण



गोरे, तर अनुमोदक म्हणून अनिल इंदाराम लोहकरे होते.विरोधी गटाकडून आकाश जाधव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पिठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली. हात वर करून घेतलेल्या मतदानात सौ. सुवर्णा राक्षे यांना १६ मते, तर आकाश जाधव यांना १० मते मिळाली. त्यानंतर सौ. सुवर्णा शाम राक्षे यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली.याच सभेत स्वीकृत नगरसेवकपदी शिवसेना चाकण शहरप्रमुख महेश शेवकरी, आझाद हिंद मंडळाचे कार्यकर्ते शशिकांत जाधव, तसेच विरोधी पक्षाकडून विकास धाडगे यांची निवड झाल्याचे नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी जाहीर केले. या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, उपजिल्हाप्रमुख प्रकाश वाडेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. निवडीनंतर नगराध्यक्षा मनिषा गोरे, गटनेते नितीन गोरे तसेच शिवसेनेच्या नगरसेवकांनी नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष सुवर्णा राक्षे व स्वीकृत नगरसेवकांचे अभिनंदन केले.या कार्यक्रमास नगरसेवक रणजित जरे, हर्षद लेंडघर, प्रेम जगताप, मंगेश कांडगे, प्रकाश भुजबळ,धीरज मुटके, साहेबराव कड, सागर बनकर, तसेच नगरसेविका जयश्री नायकवाडी, साधना गोरे, रुपाली कांडगे, आरती परदेशी, पुनम शेवकरी, स्वाती लेंडघर, अनिता घोगरे, वर्षा शेवकरी, रेश्मा मुटके, तृप्ती जगनाडे, विजया तोडकर, विजया जाधव यांच्यासह सर्व नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.